महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः ४६, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार ११ फेब्रुवारी २०२५ ते सोमवार १७ फेब्रुवारी २०२५ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

# दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाला मोठं यश; कोण होणार मुख्यमंत्री?



■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाला मोठं यश मिळालं आहे. आता राजधानीत मुख्यमंत्र्यांच्या नावाची चर्चा जोरात सुरू आहे. दरम्यान, पुढील मुख्यमंत्री भाजप आमदारांमधूनच असेल, अशी माहिती समोर आली आहे. यावेळी भाजप दिल्लीत उपमुख्यमंत्री देखील बनवू शकतात. गेल्या काही निवडणुकांनंतरही भाजपमध्ये उपमुख्यमंत्रिपदाची संकल्पना दिसून येत आहे. मंत्रिमंडळात महिला आणि दलितांचाही समावेश असेल असं सांगण्यात येत आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपने दोन तृतीयांश बहुमत मिळवले आहे. दहा वर्षांनंतर आप ने सत्ता गमावली. या विजयासह, आता दिल्लीचा पुढचा मुख्यमंत्री कोण असेल या चर्चा सुरू आहेत. भाजपामध्येही बैठकांचे सत्र सुरु आहे. पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाकडून निणर्य घेण्यासाठी चर्चा सुरू आहेत. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री साहिब सिंह वर्मा यांचे पुत्र प्रवेश साहिब सिंह वर्मा यांनी नवी दिल्ली मतदारसंघातून आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांचा पराभव करून भाजपला मोठा विजय मिळवून दिला. निकालाच्या दिवसापासूनच त्यांचे नाव चर्चेत आहे. ज्येष्ठ भाजप नेते विजेंदर गुप्ता यांनी दिल्ली भाजप प्रमुख म्हणून काम पाहिले आहे. आणि ते सातत्याने रोहिणी येथून आमदार म्हणून निवडून आले आहेत, २०१५ आणि २०२० मध्ये आपचे वर्चस्व असूनही ते विजयी झाले आहेत. गुप्ता यांनी दिल्ली विधानसभेत विरोधी पक्षनेते म्हणूनही काम पाहिले, यामुळे त्यांच्या नावाचीही चर्चा सुरू आहे. सतीश उपाध्याय हे भाजपचे ब्राहमण चेहरा मानले जातात, त्यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष, दिल्ली युवा मोर्चाचे प्रमुख आणि एनडीएमसीचे उपाध्यक्ष म्हणून काम केले आहे. त्यांना प्रशासकीय अनुभव आहे आणि त्यांनी संघटनेत अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत, ते मध्य प्रदेशचे सह-प्रभारी होते आणि त्यांचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जवळचे संबंध असल्याचे मानले जाते. यामुळे त्यांच्याही नावाची चर्चा सुरू आहे.

## संक्षिप्त

### सावधान! मुंबईमध्ये GBS चा पहिला रुग्ण आढळला

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

सध्या पुण्यात घोंगावत असलेल्या GBS आजाराने आता मुंबईतही शिरकाव केला आहे. मुंबईतील अंधेरी भागात एका पुरुषाला गुइलेन – बॅरे – सिंड्रोम झाल्याचे आढळले आहे. या रुग्णाला रुग्णालयात दाखल केले आहे. परंतु अद्याप बीएमसीकडून अधिकृतरित्या ही माहिती जाहीर करण्यात आलेली नाही. मुंबईतील अंधेरी पूर्वेकडील मालपा डोंगरी परिसरात जीबीएस आजाराने शिरकाव केला आहे. एका व्यक्तीला या





आजाराची लागण झाली असून त्याच्यावर महापालिकेच्या सेवन हिल रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जीबीएस आजाराच्या उपचारासाठी दाखल झालेल्या रुग्णाची स्थानिक आमदार मुरजी पटेल यांनी रुग्णालयात जाऊन भेट घेतली. तसंच रुग्णालयाचे अधिष्ठाता यांना भेटून या ठिकाणी जीबीएस रुग्णांसाठी ५० विशेष बेड राखीव ठेवण्याची सूचना केली. शिवाय या रुग्णांवर महात्मा फुले जीवनदायी योजनेअंतर्गत मोफत उपचार करण्याच्या सूचना देखील केल्या आहेत. पुणे, सोलापूर सारख्या शहरांनंतर गुइलेन-बॅरे- सिंड्रोमच्या शिरकाव्यामुळे मुंबईकर भयभीत झाले आहेत. पुण्यात आज या आजाराने एकाचा मृत्यू झाला असून मृतांची संख्या ६ वर पोहचली आहे.

### महापालिकेच्या कामकाजात आता एआयचा वापर

■ मुंबई : राकेश गायकवाड

आजच्या आधुनिक काळात महापालिकेच्या कामकाजातही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून महापालिकेच्या कारभारात सुसुत्रता आणण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जाणार आहे. त्यामुळे महापालिकेने मुंबईतील पायाभूत सुविधाबांबतचे निर्णय घेण्यासाठी कृत्रिम बुध्दीमत्तेचा अर्थात आर्टीफिशर इंटेलिजन्स – एआय चा वापर केला जाणार




आहे. महापालिकेच्या विकास नियोजन खात्यामार्फत या एआयचा वापर केला कामकाजात केला जाणार आहे. मुंबई महापालिकेने भविष्यातील विकासाचा कल ओळखून संभाव्य शहरी मागणीच्या अनुषंगाने पायाभूत सुविधांबाबतची निर्णय प्रक्रिया सुधारण्याकरता विकास नियोजन खात्यामार्फत कृत्रिम बुध्दीमत्तेचा अर्थात एआय वापर करण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ भूषण गगराणी यांनी आपल्या सन २०२५-२६ आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात स्पष्ट केले. महापालिकेच्या विकास नियोजन विभागाच्या माध्यमातून मुंबईतील विकास नियोजनाच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या कामांमध्ये एकूण किती इमारतींना बांधकामाच्या परवानगी दिल्या आहेत.

## 'निर्धास्त, आत्मविश्वासाने आणि प्रामाणिकपणे परीक्षेस सामोरे जा'

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

■ मुंबई : विशाल कारंडे

राज्यातील दहावी-बारावी परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना शुभेच्छा देतानाच परीक्षा ह्या कॉपीमुक्त, भयमुक्त वातावरणात व्हाव्यात या संकल्पनेला बळ



देण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांना केले आहे. विद्यार्थ्यांना आवाहन करताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी म्हटले आहे की, उज्वल भविष्यासाठी शिक्षण हा सर्वात मोठा आधारस्तंभ आहे. आगामी परीक्षांच्या काळात तुम्ही निर्धास्त, आत्मविश्वासाने आणि प्रामाणिकपणे परीक्षेस सामोरे जावे. यासाठी जिल्हा प्रशासन आपल्यासोबत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पाडण्याची संकल्पना आहे. शिक्षण हे केवळ गुणांसाठी नसून ते तुमच्या ज्ञानवृध्दी आणि जीवन घडविण्याचे साधन आहे. समाजाच्या उज्वल भविष्यासाठी स्वतःच्या मेहनतीवर विश्वास ठेवा आणि प्रामाणिक प्रयत्नांमधून यश संपादन करा, असे आवाहन करतानाच विद्यार्थ्यांना सकारात्मक वातावरण मिळावे तसेच त्यांच्यात आत्मविश्वास वाढेल यासाठी पालक व शिक्षकांनी मार्गदर्शन करुन त्यांची मानसिक तयारी करून घ्यावी, असेही उपमुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. कॉपीमुक्त परीक्षा प्रक्रियेसाठी जिल्हयातील सर्व परीक्षा केंद्रे भयमुक्त व कॉपीमुक्त राहतील यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी केली आहे. राज्यामध्ये कॉपी प्रकरणास पुर्णतः प्रतिबंध करण्यासाठी व कॉपीमुक्त आणि पारदर्शक परीक्षा प्रक्रीयेसाठी जिल्हा प्रशासनाद्वारे विविध उपाययोजना करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांना पाठवलेल्या संदेशात म्हटले आहे.

## लाडक्या बहिणीचे टेन्शन वाढले! घरोघरी जाऊन होणार कारची तपासणी

■ पुणे : अभिजीत येरल्लू

कुटुंबात कार असणाऱ्या लाभार्थी महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात येणार आहे. पडताळणीसाठी बालविकास प्रकल्प अधिकारी, परिवेक्षिका, अंगणवाडीसेविका घरोघरी जाऊन पाहणी करणार आहेत. राज्याच्या महिला व बालविकास कल्याण विभागाचे सचिव अनुपकुमार यांनी राज्यातील सर्व जिल्हा महिला व बालविकास कल्याण अधिकाऱ्यांशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठक घेतली होती. त्या वेळी त्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थींच्या घरोघरी जाऊन कार आहे का? याची पाहणी करण्याच्या सूचना केल्या होत्या. याबाबत राज्य सरकारच्या वतीने जिल्हा प्रशासनाला यादी पाठविण्यात आली असून, तीत जिल्हयात ७५ हजार १०० लाभार्थी महिलांच्या कुटुंबात कार असल्याचे समोर आले आहे. या सगळ्यांच्या घरोघरी जाऊन तपासणी करण्यात येणार आहे. सोमवारपासून याची सुरुवात होत आहे.



याद्यांनुसार प्रत्येक जिल्हयात बालविकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका आणि अंगणवाडीसेविका घरोघरी जाऊन पडताळणी करणार आहेत. यानंतर ही यादी तयार करून महिला व बालकल्याण विभागाला पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर ही यादी राज्य सरकारला पाठविण्यात येणार आहे. यात तथ्य आढळ्यास तत्काळ योजनेतून नाव वगळण्यात येणार आहे.

पुणे जिल्हयातील २१ लाख ११ हजार ९९१ महिलांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज केले होते. त्यापैकी २० लाख ८९ हजार ९४६ महिला पात्र ठरल्या आहेत. शासनाकडून पुणे जिल्हा प्रशासनाला वर्गवारी करून यादी पाठविण्यात आली आहे. यात यादीत ७५ हजार १०० नावे असून, लाभार्थी महिला आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या नावाने कार आहेत. राज्य सरकारकडून स्वतःहून महिलांनी लाभ सोडावा, असे आवाहन केले होते. त्याला अगदी कमी प्रतिसाद मिळाला. त्यामुळे पडताळणी केली जात आहे. (शेष पृष्ठ ३ वर)

## 'मी CM झालो तेव्हा राज ठाकरेंनी..' फडणवीसांनी सांगितलं भेटीमागचे खरं कारण

■ मुंबई : सम्यक कासारे

महाराष्ट्रातील राजकारणात काहीतरी नवं घडणार अशा चर्चांना उधाण आणण्यासाठी कारणीभूत ठरलेल्या भेटीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरेंची त्यांच्या दादरमधील 'शिवतीर्थ' या निवासस्थानी जाऊन भेटल्यानंतर फडणवीसांनी भेटीबद्दल भाष्य केलं आहे. फडणवीस हे 'परीक्षा पे चर्चा'च्या कार्यक्रमात सहभागी झाले होते. या कार्यक्रमानंतर प्रसारमाध्यमांसी चर्चा करताना फडणवीसांना त्यांनी कार्यक्रमाला येण्यापूर्वी घेतलेल्या राज ठाकरेंच्या भेटीबद्दल प्रश्न विचारण्यात आला. भाजपा मनसेला साथ देणार का असा थेट सवाल फडणवीसांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी राज यांची भेट का घेतली आणि भेटीत काय घडलं याबद्दलची माहिती दिली. 'परीक्षा पे चर्चा'च्या कार्यक्रमातून बाहेर




पडल्यानंतर फडणवीसांनी प्रसारमाध्यांशी संवाद साधला. त्यावेळेस एका पत्रकाराने, 'तुम्ही आज सकाळी राज ठाकरेंची भेट घेतली. त्यामुळे मनसेला पुन्हा भाजपा साथ देतांय अशा चार्चा सुरु झाल्या आहेत,' असं म्हणत फडणवीसांना प्रश्न विचारला. (शेष पृष्ठ ३ वर)

## पुण्यातील ५५ ठिकाणचे पाणी पिण्यास अयोग्य! राज्य आरोग्य प्रयोगशाळेच्या तपासणीतील निष्कर्ष

■ पुणे : अकिल शेख

पुण्यात नांदेडगाव परिसरात गुइलेन बॅरे सिंड्रोमचा उद्रेक झाला आहे. या परिसरातील पाण्याचे नमुने रासायनिक आणि जैविक तपासणीसाठी राज्य आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले होते. त्यातील ५५ ठिकाणचे पाणी नमुने दूषित आढळले असून, ते पिण्यास अयोग्य असल्याचे निष्पन्न झाले आहे. दरम्यान, जीबीएसच्या रुग्णसंख्येतील वाढ सुरूच असून, एकूण रुग्णसंख्या १८४ वर पोहोचली



आहे. आरोग्य विभागाने जीबीएसचे रुग्ण आढळून आलेल्या परिसरातील पाण्याचे नमुने आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठविले होते. नांदेडगाव परिसरात जीबीएसचा उद्रेक झाला असल्याने तेथील सर्वाधिक नमुने होते. या पाण्याच्या नमुन्यांची रासायनिक आणि जैविक तपासणी राज्य आरोग्य प्रयोगशाळेने केली. एकूण ४ हजार ७६१ नमुन्यांची तपासणी करण्यात आली. त्यातील ५५ पाणी नमुने दूषित आढळले असून, ते पिण्यास अयोग्य असल्याचा निष्कर्ष प्रयोगशाळेने काढला आहे. पिण्यास अयोग्य आढळलेले सर्व नमुने नांदेड गाव परिसरातील आहेत, अशी माहिती आरोग्य विभागातील सूत्रांनी दिली.

(शेष पृष्ठ ३ वर)

## मुंबईत आणखी सात ठिकाणी नवीन अग्निशमन केंद्र स्थापन केले जाणार

■ मुंबई : गणेश बागडे

मुंबई शहराची वाढती संख्या लक्षात घेऊन मुंबईत आणखी सात ठिकाणी नवीन अग्निशमन केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. कांदिवली, कांजूरमार्ग, सांताक्रूझ, चेंबूर व अंधेरी आणि सागरी किनारा मार्गालागत दोन अशी सात नवीन केंद्रे बांधण्यात येणार आहेत. त्यापैकी कांदिवली आणि कांजूरमार्ग येथील केंद्रे पूर्णत्वास आली आहेत. मुंबईत कुठेही आग लागली तर अवघ्या काही मिनिटात अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचतात ही मुंबई अग्निशमन दलाची एकेकाळची ख्याती होती. मात्र मुंबईतील लोकसंख्या आणि वसाहती, गाड्यांची संख्या वाढल्यामुळे अग्निशमन दलाच्या गाड्या अनेकदा वाहतूक कोंडीत अडकून पडतात. त्यामुळे अग्निशमन



दलाची केंद्रे वाढण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. त्यानुसार गेल्या काही वर्षापासून मुंबई महापालिकेने अग्निशमन दलाची केंद्रे वाढवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. अग्निशमन दलाची क्षमता व सुविधा सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत ठाकूर व्हिलेज – कांदिवली पूर्व,एल.बी.एस. मार्ग – कांजूरमार्ग (प.) या दोन्हीही ठिकाणी नवीन अग्निशमन केंद्र बांधण्यात येणार आहेत. त्यापैकी कांदिवली केंद्राचे काम पूर्ण झाले आहे. कांजूरमार्ग येथील काम पूर्ण होत आले आहे.त्याचबरोबर जूहू तारा रोड – सांताक्रुझ (प.), माहूल रोड-चेंबूर व टिळक नगर येथे नवीन अग्निशमन केंद्र बांधण्याचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे. अग्निशमन दलाच्या दर्जोन्नतीसाठी चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात विविध प्रकल्पांसाठी १६० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तर २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात २६१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर सागरी किनारा मार्गालगत दोन ठिकाणी अग्निशमन केंद्र उभारण्यात येणार आहेत. मरीन ड्राईव्ह ते वरळी अशा सागरी किनारा मार्गाचे ९५ टक्के पूर्ण झाले असून हा मार्ग नुकताच पूर्ण क्षमतेने सुरु केला आहे. या मार्गावर एखादी दुर्घटना झाल्यास आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ सेवा देता यावी यासाठी पालिकेने सागरी किनारा मार्गालगत दोन अग्निशमन केंद्रे उभारण्याचे ठरवले आहे.

## नाशिक ते पालघर १८०२० कोटींचा मेगा प्रोजेक्ट; ४ तासांचा प्रवास फक्त एका तासात

■ मुंबई : मेहुल गायकवाड

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग आणि मुंबई-दिल्ली महामार्ग हे महाराष्ट्रातील दोन अत्यंत महत्वाचे प्रकल्प आहेत. या दोन्ही प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर आहे. अशातच या महामार्गालगत १८०२० कोटींचा नाशिक पालघर महामार्ग उभारला जात आहे. या मेगा प्रोजेक्टमुळे नाशिक ते पालघर ४ तासांचा प्रवास फक्त एका तासात पूर्ण होणार आहे.



वाढवण बंदर आणि नाशिक यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी हा महत्वाकांक्षी द्रुतगती महामार्ग बांधला जात आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) मार्फत नाशिक ते पालघर असा ११८ किमी लांबीचा महामार्ग बांधला जाणार आहे. हा महामार्ग मुंबई-सुरत समृद्धी महामार्गाशी जोडला जाणार आहे. यानंतर चारोटी-इगतपुरी दरम्यान ८५.३८ किमी लांबीच्या मार्गापर्यंत पुढे जाणार आहे.

मुंबई-नागपूर द्रुतगती समृद्धी महामार्ग हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा महामार्ग आहे. ७०० किलोमीपेक्षा मोठा असा हा महामार्ग मुंबई आणि नागपूरला जोडणारा आहे. महाराष्ट्रातील १० जिल्हयांना जोडणारा हा महामार्ग ३९० गावांमधून जाणार आहे. तर, दिल्ली-मुंबई महामार्गामुळे २४ तासांचा प्रवास १२ तासात पूर्ण होणार आहे. हा ग्रीनफिल्ड एक्स्प्रेस-वे आठ पदरीचा आहे. दिल्ली-मुंबई महामार्गावरच मुंबई - वडोदरा - जेएनपीटी बंदराला जोडणारा मार्ग आहे. समृद्धी महामर्गावर आमने येथून एका बाजूने वडोदरा-मुंबई एक्स्प्रेस वे व दुसऱ्या बाजूने सध्याच्या नाशिक महामार्गासाठी एकूण सहा किमी लांबीचा जोडरस्ता बांधला जात आहे.

(शेष पृष्ठ ३ वर)

महाराष्ट्र क्राईम टाइम्स






## दोघांचे भांडण भाजपचा लाभ!

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर त्याची पुनरावृत्ती दिल्लीत होईल, असा एक अंदाज भाजपवाले मांडत होते, तो खरा ठरला. निवडणूक निकालानंतर भाजपवर होणारे निवडणूक प्रक्रियेविषयीचे आरोप आता जुने झाले आहेत. या आरोपांपलीकडे जाऊन किमान सामाईक मुद्यावर होणारे ऐक्य अजूनही दूरच आहे. आपच्या पराभवामुळे काँग्रेसला आनंद झाला असेल या संजय राऊत यांच्या विधानाचा अर्थ हाच आहे. दिल्लीतील विधानसभा निवडणुकीने एक गोष्ट निर्विवाद स्पष्ट केली आहे, हीच गोष्ट महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतही स्पष्ट झाली होती. पराभवाचे खापर परस्परांवर फोडण्यापेक्षा लोकांच्या जगण्याशी संबंधित मुद्यांवर एकत्र येण्याचे संकेत या दोन्ही निवडणुकीतील जनमताने दिले आहेत. महाराष्ट्र विधानसभेतून दिल्लीतील भाजप विरोधकांनी काहीही धडा घेतला नसल्याचे चित्र आहे. केवळ निवडणूक प्रक्रियेविषयी साशंकता व्यक्त करून स्वत:चे समाधान करण्याचा मार्ग विरोधकांसाठी नाईलाज ठरलेला आहे. हा मुद्दा वगळून दिल्लीतील भाजपच्या विजयाचे विश्लेषण करायला हवे. सामान्य माणसांच्या थेट जगण्याशी संबंधित मुद्दे हे 'आप'चे बलस्थान होते. भाजपची निर्विवाद सत्ता आणि निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण करून मानसिक पराभवाच्या छायेत विरोधक आधीपासूनच होते.



त्यामुळे सामान्यांचे प्रश्न विरोधकांकडून पुरेसे उचलले गेले नाहीत. राजधानी दिल्लीतच केंद्रीय सत्तेची सर्वोच्च शक्ती कार्यरत असल्याने या ताकदीला आव्हान देण्यासाठी विरोधकांनी एकत्र येण्याची गरज होती. परंतु तसे झाले नाही, परिणामी सगळयांना पराभव पत्करावा लागला. त्यात काँग्रेसला मिळालेला धक्का सर्वात मोठा आहे. जी दिल्ली काँग्रेसच्या आजपर्यंतच्या इतिहास आणि सत्तेच्या केंद्रस्थानी राहिली आहे. त्याच दिल्लीत मिळालेले 'शून्य' काँग्रेसला आत्मचिंतन करायला भाग पाडणार आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या झालेल्या दिल्लीतल्या पराभवाची महाराष्ट्राने दखल घ्यायला हवी. महाराष्ट्रात विभाजनानंतर केंद्रातील चाचणी परीक्षा म्हणून अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ३० उमेदवारांना सोबत घेऊन दिल्ली लढवली होती. राष्ट्रीय पक्षाचा दर्जा पुन्हा मिळवण्याचा राष्ट्रवादीच्या अजित पवारांचा हा प्रयत्न फोल ठरला. काँग्रेसची जिथे धूळदाण उडाली तिथे अजित पवारांची राष्ट्रवादी कागदासारखी उडून गेली. या निवडणुकीत मायावती, औवेसी, चिराग पासवान आणि नितीश कुमार यांनीही आपली ताकद पणाला लावली होती. भाजपच्या झंझावातात हे सगळे पक्ष सुकलेल्या गवतासारखे उडून गेले. या सर्वांनी एकत्र येऊन काँग्रेसच्या साथीने, आम आदमी पक्षाकडे नेतृत्व सोपवले असते तर कदाचित भाजपचा हा विजय एवढा सहजसोपा राहिला नसता. परंतु काँग्रेस आणि आम आदमी पक्षातील अहंकारी शीतयुद्धाचा हा परिणाम म्हणावा लागेल. ठाकरे गटाच्या शिवसेनेतील संजय राऊत यांनी दिल्लीच्या पराभवावर मांडलेले मत हेच स्पष्ट करत आहे. भाजपची घोडदौड रोखण्यासाठी विरोधकांना एकत्र आल्याशिवाय पर्याय नाही, काँग्रेसनेही आपल्या इतिहासकालीन भ्रमातून बाहेर पडून वास्तवाचे भान स्वीकारायला हवे. विरोध करताना तो केजरीवालांना करावा की भाजपला? काँग्रेसच्या या संदिग्धतेचा हा परिणाम आहे. दिल्लीतील लोकसंख्येची वाढ हा मुद्दा निवडणुकीत महत्त्वाचा होता. ही लोकसंख्या रोजगाराच्या शोधामुळे वाढली असताना या गंभीर मुद्याकडे विरोधकांनी पुरेसे लक्ष दिले नाही.

# प्रयागराजची चेंगराचेंगरी नाशिकमध्ये होऊ नये!

मी नास्तिक आहे असे सांगितल्यास कदाचित मला धर्मद्रोही, देशद्रोही, पापी, शरमशून्य, विकला गेलेला, तथाकथित पुरोगामी, लाज लावणे हिंदू, त्यातही ब्राम्हण या किंवा अशा स्तवनाने आरती ओवाळून धिक्कार असो या कुळाचा असे काही ऐकावे लागेल. प्रयागराज इथल्या कुंभमेळ्यात अनावश्यक चेंगराचेंगरी होऊन ३० भाविक मरण पावले. ते ३० होते, की ३०० हे यथावकाश कळेल. मुळात त्यावेळी, तिथे किती भाविक उपस्थित होते, हे जर ठावूक नसेल, तर तो हिशोब लागणे कठीण. कदाचित त्यांची गणना लापतामध्ये होऊ शकते. एकावेळी एके ठिकाणी, न बोलावता कोटींच्या संख्येत अबाल वृद्ध, स्त्री- पुरुष जमा होतात याचे कवतिक करणाऱ्यांची कीव येते. बेशिस्त झुंडी तिथे लोटल्यावर जे होणे अटळ असते, तेच झाले. अशा ठिकाणी बंदोबस्त ठेवणारे पोलीस अकारण काठ्या सरसावून गर्दीला मागे ढकलत तणाव वाढवत असतात. अशा गर्दीत अगदी मागे असलेले, माहिती न घेता काहीतरी अफवा पसरवून पळापळ करतात. लहान मुले, वृध्द आपल्या कुटुंबांपासून दुरावतात आणि कुठेतरी दूरवर भयभीत होऊन आक्रोश करू लागल्याने संतापलेले तरुण दंगल सुरू करतात. परिस्थिती हाताबाहेर जाते आणि दुबळे, वृध्द, लहान मुलं अक्षरश: पायदळी तुडवली जातातष्ठ. मृत पावतात. अशाच घटना थोड्याफार फरकाने यात्रे, जत्रेत घडत असतात.अशा बेशिस्तांना भाविक किंवा भक्त म्हणण्याची प्रथा पडली असल्याने सरकारी मदत तात्काळ मंजूर होते.

नाशिकला बारा वर्षांनी भरतो, तो सिंहस्थ. तो आता येऊ घातलाय. मागच्या सिंहस्थात अशाच एका शाही स्नान तिथीला, चेंगराचेंगरीत अनेकांचे जीव गेले होते. अत्यंत अरुंद गल्ल्यामधून साधूंच्या शाही मिरवणुका डुबक्या मारण्यासाठी गोदावरी तीरावर येतात. त्यात महंत (सेलिब्रिटी) फुलांनी सजवलेल्या स्वयंचलित रथांवर विराजमान होऊन, दुतर्फा दर्शनासाठी उभ्या असलेल्या भाविकरुपी बघ्यांकडे बघून आशीर्वाद देत असल्यासारखे हात हलवित होते, आणि फुले उधळावित तशी सुट्ट्या पैशांची नाणी जमावाच्या दिशेने फेकीत असताना, ती उचलण्यासाठी जमाव खाली वाकला, त्यात अनेकजण तुडवले जाऊन मृत्युमुखी पडले. अशी नाणी फेकणाऱ्याना महंत का म्हणावे, आणि आशाळभूत होऊन ती उचलणाऱ्यांना भाविक का म्हणावे असा प्रश्न कुणाला पडो अथवा न पडो, पण फुकटच्या उदारपणे जनतेचे पैसे मदत म्हणून सढळपणे वाटणाऱ्या सरकारला तरी पडायला हवेत.



देशाचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, गृहमंत्री यांनी अशा ठिकाणी जावे की जाऊ नये हा विषय वादाचा नाही. डुबकी मारल्याने पापे नाहीशी होतात हा सिद्धांत मान्य असल्याने आपण जातो, हा संदेश सामान्य नागरिकात पसरणे चुकीचे. गाजावाजा न करता, खासगी स्वरूपात भेट देणे वेगळे, आणि सरकारी पाहुणचार घेत, जगभर बातमीचा विषय करीत पापे धुण्याच्या अशास्त्रीय कल्पनेला प्रोत्साहन देणे अयोग्य आहे. अशी डुबकी मारल्याने पापे नाहीशी होतात, हे खरे मानले तर, वर्षानुवर्ष गुन्हेगारांना कारागृहात ठेवायचे कशाला. खून केला पाच डुबक्या, स्त्रियांवर अत्याचार तीन डुबक्या, लाचलुचपत? फक्त पळीभर त्रिवेणी संगमावरचे पाणी शिंपडायचे. येण्या जाण्याचा खर्च सरकार करेल. हरकत काहीच नाही, कारागृहे चालवण्यापेक्षा बरे ना.

कुंभमेळे आयोजित करावे लागत नाहीत. ते होतच असतात, पंढरपूरची वारी गेली कित्येक शतके सुरू आहे. तेव्हा प्रवासाची साधने, वाहने नसल्याने सगळ्या कामासाठी लोक पायीच फिरत. तालुक्याच्या ठिकाणी आठवडे बाजाराला पायी चालत जाणारे तेव्हाही होते, आजही आहेत. त्यामुळे ती एक सहज कृती होती. त्याचे आता अकारण, अवास्तव गोडवे गायले जातात इतकेच. वारीत ५/७ किलोमीटर चालून फोटोंचं पीक घेणारे, स्वत:च्या गावात, पाव मैल दुधाची पिशवी आणायला जाताना चार चाकी घेऊन जाताना मी नेहमी बघतो. हिंदू धर्मात जे जे काही चांगले, ते ते सगळे गीतेतून येते, औषध प्रणाली ही आयुर्वेदातून येते आणि आजचे आधुनिक तंत्रज्ञान पाच हजार वर्षांपूर्वी कसे आम्हाला (म्हणजे फक्त हिंदूंना) ठावूक होते हे सांगण्याचे आणि तेच खरे असे मानणाऱ्या वर्गाचे प्रतिनिधी सत्तेत असल्याने या सगळ्या अनाठायी खर्चास विरोध करणे म्हणजे देशद्रोह, असे अजब समीकरण तयार होत आहे. मागील वर्षी याच सुमारास राम मंदिराचे लोकार्पण झाले. त्याच्या अक्षदा, म्हणजे निमंत्रण घरोघरी जाऊन दिले गेले. माझ्याही घरी आले होते. त्यांनी ती पत्रिका माझ्या हातात देतानाचा फोटो काढण्याचा प्रस्ताव ठेवला. हे कशाला? माझा प्रश्न. नाहीष्ठ ते आम्हाला आमच्या संघटनेला (संघ) कळवायचं आहे. मग कळवा नाष्ठ फोटो कशाला. पुरावा लागतो. तुमच्या संघटनेचा तुमच्यावर विश्वास नाही काष्ठ. ते उगाच हसून निघून गेले. वैधानिक पदांवर असणारी व्यक्ती कोणत्या पक्षाची याला फारसे महत्त्व असू नये. ते पद एकदा स्वीकारले की, ती व्यक्ती देशाची असते. जात, धर्म, वैयक्तिक काही गोष्टींची जाहीर वाच्यता या गोष्टी टाळायला हव्यात. संविधान इतरांनी पायदळी तुडवले आणि आम्ही डोक्यावर घेतले असे होत नसते. प्रत्येक सत्ताधारी आपल्या सोयीनुसार त्याचा अर्थ काढत असतो, आणि आत्ताचे सत्ताधीश त्याला अपवाद नाहीत.

## कनिष्ठ आणि उप अभियंता पदाच्या परीक्षा अधिकृत केंद्रावर घ्या, अंबादास दानवे यांची पालिका आयुक्तांकडे मागणी

■ मुंबई : नितीन देवळेकर

मुंबई महापालिकेच्या कनिष्ठ आणि उप अभियंता पदासाठी ९ फेब्रुवारी रोजी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात येणार आहेत. मात्र, या परीक्षेत पेपर फुटीचा प्रकार घडू नये, यासाठी संबंधित परीक्षा अधिकृत केंद्रावर घेण्यात याव्यात, अशी मागणी शिवसेनेचे नेते व विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पालिका आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी यांच्याकडे केली आहे. दानवे यांनी गुरुवारी महापालिका आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी यांची भेट घेऊन याबाबत चर्चा केली. तसेच मागणीसंदर्भात सविस्तर निवेदन सादर केले. कनिष्ठ आणि उप अभियंता पदाच्या परीक्षा ९ फेब्रुवारी रोजी होत आहेत. गेल्या काही महिन्यांपूर्वी तलाठी व अन्य परीक्षांचे पेपर फुटले होते.



ज्या संस्थेमार्फत या परीक्षा घेण्यात आल्या होत्या, त्याच संस्थेवर कनिष्ठ व उप अभियंता पदाच्या परीक्षेचे आयोजन करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे शिवसेना नेते व आमदार आदित्य ठाकरे यांच्या सूचनेनुसार, मुंबई महानगरपालिकेतर्फे कनिष्ठ अभियंता आणि उप अभियंता या पदांसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षा या अधिकृत केंद्रांवर आणि नि:पक्षपातीपणे घेण्यात याव्यात, अशी मागणी शिवसेनेने केली आहे.

## सिनेमात काम देण्याच्या नावाखाली अभिनेत्रीवर बलात्कार, निर्माता फरार, मिरा रोड मध्ये गुन्हा दाखल

■ वसई : विशेष प्रतिनिधी

सिनेमात काम देतो असे सांगून एका २९ वर्षीय नवोदीत अभिनेत्रीवर निर्मात्याने वारंवार बलात्कार केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मिरा रोड पोलीस ठाण्यात सिने निर्माता हरेश संघानी याच्या



विरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सिनेमात अभिनेत्री बनण्याचे स्वप्न घेऊन अनेक जण देशाच्या विविध भागातून मायानगरी मुंबईत येत असतात. सिनेमात काम मिळाल्यावर चंदेरी आयुष्याच्या झगमगाटात आयुष्य उजळून निघते. पण सिनेमात काम मिळणे एवढे सोप्पे नसते.


सार्वजनिक बांधकाम विभाग
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.

निविदा सूचना क्रमांक २८ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था ( फक्त मुंबई उपनगर जिल्हा (पश्चिम) करीता) कुशल अ-वर्ग कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब -१ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र | कामाचे नांव | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १. | मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, गोरेगाव, मुंबई येथील, गोरेगाव उप परिसरातील स्टाफ इमारतीच्या उत्तरेकडील कर्मचारी कार्यालयाचे बाहेरील बाजूचे गिलावा आणि रंगरंगोटी करणे व जिन्याच्या आतील व बाहेरील बाजूचे गिलावा आणि रंगरंगोटी करणे. | रु. ४७५११७२.०० |
| २. | मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, गोरेगाव, मुंबई येथील, गोरेगाव उप परिसरातील स्टाफ इमारतीच्या पश्चिमेकडील कर्मचारी कार्यालयाचे बाहेरील बाजूचे गिलावा आणि रंगरंगोटी करणे व अंतर्गत आणि बाह्य पाणी पुरवठा पाईप लाईनचे आणि पाण्याच्या टाकीचे नूतनीकरण करणे. | रु. ४९२६३३९.०० |
| ३. | मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, गोरेगाव उपपरिसर, मुंबई येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीच्या अंतर्गत आणि बाह्य पाणी पुरवठा पाईप लाईनचे आणि पाण्याच्या टाकीचे नूतनीकरण करणे. | रु. २३६२६४०.०० |

ई - निविदा वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी | दिनांक ०४/०२/२०२५ @ १५:०० पासून दिनांक १८/०२/२०२५ @ १७:०० पर्यंत. |
| २ | निविदा सादर करण्याचा कालावधी | दिनांक ०४/०२/२०२५ @ १५:०० पासून दिनांक १८/०२/२०२५ @ १७:०० पर्यंत. |
| ३ | निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दिनांक २०/०२/२०२५ @ ११.३० वाजता (शक्य झाल्यास) कार्यकारी अभियंता, सा.बां विशेष प्रकल्प विभाग आरे, गोरेगाव ,मुंबई-४०००६५ यांचे कार्यालय |

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. https://mahapwd.com
२. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई-४०००६५, कार्यालयातील सूचना फलक.

जा. क्र. साबांविप्र-आरे/नि.लि./ 234
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.
दुरध्वनी क्रं. ०२२-२९२७२४४७
दिनांक:- 31/01/2025

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/६११७



महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला, भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.
E-mail-northmumbai.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८

निविदा सुचना क्र. ५१ सन २०२३-२०२४

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, दादाभाई मार्ग, भवन्स कॉलेज जवळ अंधेरी (प) मुंबई-४०००५८ (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिका बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र दिनांक- १०/०२/२०२५ ते दिनांक- २४/०२/२०२५ कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांचे कार्यालयात उपलब्ध असतील. तसेच दिनांक- २५/०२/२०२५ दुपारी १७.०० वाजेपर्यत निविदा स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दीवशी निविदा उघडण्यात येतील निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत कर्मचारी राज्य विमा निगम, अंधेरी (पूर्व) टाईप-२ इमारत क्र.२ व ४ कर्मचारी राज्य विमा निगम, अंधेरी (पूर्व) येथील स्थापत्य कामे करणे. | रु.६१२७५९/- |
| २ | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत कर्मचारी राज्य विमा निगम, अंधेरी (पूर्व) टाईप-१ इमारत क्र.१ कर्मचारी राज्य विमा निगम, अंधेरी (पूर्व) येथील स्थापत्य कामे करणे. | रु.६०६५६९/- |
| ३ | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत कर्मचारी राज्य विमा निगम, अंधेरी (पूर्व) टाईप-१ इमारत क्र.२ कर्मचारी राज्य विमा निगम, अंधेरी (पूर्व) येथील स्थापत्य कामे करणे. | रु.५९३७३१/- |
| ४ | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत कर्मचारी राज्य विमा निगम, अंधेरी (पूर्व) टाईप-१ इमारत क्र.३ कर्मचारी राज्य विमा निगम, अंधेरी (पूर्व) येथील स्थापत्य कामे करणे. | रु.६००१५६/- |
| ५ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत प्रेसीडेंसी मॅजिस्ट्रेट कुर्ला जुनी इमारत. आणि नवीन इमारत. आय.टी.आय कार्यशाळा भवन कुर्ला, विक्रोळी न्यायालय भवन इमारत क्रमांक २ आणि ३, विक्रोळी पोलिस स्टेशन, कुर्ला पोलिस स्टेशन, नेहरूनगर पोलिस स्टेशन, इमारत अ आणि ब ब्लॉक, ६ पी.आय. वसाहत कुर्ला पोलीस लाईनयेथे वार्षिक दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (6 महिने ) | रु. ८४१५७३/- |
| ६ | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत कर्मचारी राज्य विमा निगम, अंधेरी (पूर्व) टाईप-४ इमारत क्र.१ व २ कर्मचारी राज्य विमा निगम, अंधेरी (पूर्व) येथील स्थापत्य कामे करणे. | रु.८०९४४३/- |
| ७ | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत अंधेरी (पूर्व) येथील ई.एस.आय.एस. हॉस्पिटल शासकीय वसाहत मधील प्रकार-3 इमारत क्रमांक 1 आणि 2 ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | रु. ८२०९०१/- |
| ८ | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत कर्मचारी राज्य विमा निगम, अंधेरी (पूर्व) टाईप-३ इमारत क्र.३ व टाईप-४ इमारत क्र.३ कर्मचारी राज्य विमा निगम, अंधेरी (पूर्व) येथील स्थापत्य कामे करणे. | रु.६४८३६१/- |
| ९ | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत घाटकोपर येथील सी.टी.आय. होमगार्ड आणि जनरल लॉक-अप बिल्डिंग सी.आय.डी. कार्यालय, रेशनिंग कार्यालय, संजय गांधी योजना कार्यालय, भांडुप पोलिस स्टेशन आणि मुलुंड पोलिस स्टेशन मुलुंड येथे आणि घाटकोपर (पश्चिम), मुंबई येथील सी.आय.डी. कार्यालय ची दुरुस्ती | रु.६६५७०६/- |
| १० | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत प्रेचेबूर, मुंबई येथील प्रशासकीय इमारती, फेज-1 आणि 2 ची वार्षिक देखभाल करणे. | रु. ६९९५२०/- |
| ११ | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत चेंबूर येथील बसंत पार्क पोलिस स्टेशन, 80 कॉन्स्टेबल बिल्डिंग, 'अ आणि ब', 32 कॉन्स्टेबल 'अ आणि ब' विंग, अतिरिक्त पोलिस आयुक्त कार्यालय इमारत, चेंबूर येथे. चेंबूर आणि टिळक नगर पोलिस स्टेशन येथील 10 पी.एस.आय. बिल्डिंग आणि टिळक नगर, मुंबई येथील इमारत क्रमांक 117 यांचे वार्षिक देखभाल करणे. | रु. ७५०६१५/- |
| १२ | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत मुंबईतील मानखुर्द येथील चिल्ड्रन एड सोसायटी येथे मुलांच्या कर्मचाऱ्यांच्या कार्यालयाच्या बॅरेक, देवनार येथील विशेष पुनर्वसन केंद्र आणि विशेष निरीक्षण गृह, मुलांचे कुटीर, मुलींचे कुटीर, चेंबूरमधील मुलांचे घर आणि एमडीसी मुले आणि मुलींचे वसतिगृह, आयटीआय प्रशिक्षण केंद्र यांचा वार्षिक देखभाल करणे. | रु. ७५०६१५/- |
| १३ | वार्षिक देखभाल दुरुस्ती मानखुर्द, मुंबई येथील चिल्ड्रन्स एड सोसायटी येथील देओनार, प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत बाल कल्याण नगरी, नवजीवन महिला वसतिगृह इमारतीची वार्षिक देखभाल करणे. | रु. ७८८९५०/- |
| १४ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत प्रकार - ५ व बाह्यरुग्ण विभाग इमारत राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार मुलुंड येथे वार्षिक दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | रु. ४२७६६६/- |
| १५ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत परिचारीका वसतीगृह, मेडीकल कॉन्सील, जागतीक बॅक प्रकल्प इमारत, भांडार व शाळेची इमारत राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार मुलुंड मुंबई येथे वार्षिक दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | रु. ८०७७३३/- |
| १६ | मुळगौण कामांतर्गत मुलुंड (प.), मुंबई ई.एस.आय.एस. रुग्णालयातील प्रकार ५ इमारत क्र. १ ते २ येथे ड्रेनेज लाइनची दुरुस्ती करणे (प्लिंथ संरक्षण) | रु. ८१६४९६/- |
| १७ | मुळगौण कामांतर्गत मुलुंड (प.), मुंबई ई.एस.आय.एस. रुग्णालयातील प्रकार २ इमारत क्र. १ ते २ येथे प्लिंथ संरक्षणाची दुरुस्ती करणे. | रु. ८३९८९९/- |
| १८ | मुळगौण कामांतर्गत मुलुंड (प.), मुंबई ई.एस.आय.एस. रुग्णालयातील प्रकार २ इमारत क्र. ३ ते ४ येथे प्लिंथ संरक्षणाची दुरुस्ती करणे. | रु. ८३७११०/- |
| १९ | मुळगौण कामांतर्गत मुलुंड (प.), मुंबई ई.एस.आय.एस. रुग्णालयातील प्रकार ५ येथे ड्रेनेज लाइनची दुरुस्ती करणे. | रु. ८४०१४०/- |
| २० | मुळगौण कामांतर्गत मुलुंड (प.), मुंबई ई.एस.आय.एस. रुग्णालयातील प्रकार २ इमारत क्र. १ ते ३ येथे ड्रेनेज लाइनची दुरुस्ती करणे. | रु. ८४३६७०/- |
| २१ | मुळगौण कामांतर्गत मुलुंड (प.), मुंबई ई.एस.आय.एस. रुग्णालयातील प्रकार ३ आणी ४ येथे ड्रेनेज लाइनची दुरुस्ती करणे. | रु. ८०२७४५/- |
| २२ | वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत वांद्रे मुंबई येथील 6 ब्लॉक पोलिस चौकींची फिक्स्चर आणि फास्टनिंग, दरवाजा/शटर/फ्रेमची दुरुस्ती, स्वच्छतागृहे आणि पाणीपुरवठा आणि विविध वस्तूंची दुरुस्ती. | रु. ५२१३००/- |
| २३ | मुळगौण कामांतर्गत मरोळ पोलीस कॅम्प अंधेरी पुर्व येथील मोटार कार्यशाळेतील लाईट व्हेईकल सिम्युलेटर आणि लेक्चर रुममधे पार्टीशन करणे. | रु. ५७६५८८/- |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८.यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ 829
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :-

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/६२८६


Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# मुंबई महानगरपालिकेच्या प्रसूतिगृहांमध्ये महिलांची कर्करोग तपासणी करणार

■ **मुंबई : सम्यक कासारे**

महानगरपालिकेने नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये कर्करोगावरील उपचारांवर लक्ष्य केंद्रीत केले आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या प्रतूतिगृह व आरोग्य केंद्रांमध्ये मुख, स्तन व गर्भाशयाच्या कर्करोगाची तपासणी करण्यात येणार आहे. फेब्रुवारीच्या अखेरीस ही सुविधा सुरू होण्याची शक्यता आहे. मुंबई महानगरपालिकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये कर्करोगांवरील उपचारांसाठी 'विभागनिहाय सर्वसमावेशक कर्करोग सेवा मॉडेल' राबविण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे. या उपक्रमांतर्गत मुख, स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोग नियंत्रणासाठी प्रत्येक विभागातील प्रसूतिगृह आणि आरोग्य केंद्रामध्ये कर्करोग तपासणी क्लिनिक सेवा महिन्यातून एक किंवा दोन दिवस सुरू करण्यात येणार आहे. जेणेकरून कर्करोगाचे वेळीच निदान होऊन त्यावर उपचार करणे शक्य होणार आहे. देशभरामध्ये स्तन कर्करोगाचे प्रमाण वाढत असून, नुकत्याच झालेल्या संशोधनानुसार २५ ते ५० वयोगटातील महिलांमध्ये स्तन कर्करोगाचे प्रमाण अधिक आहे. ६० टक्के महिलांमधील कर्करोगाचे प्रमाण अखेरच्या




टप्प्यात लक्षात येत असल्याने अनेकांचा मृत्यू होत आहे. मात्र लवकर निदान झाल्यास ९८ टक्के महिलांचे प्राण वाचविणे शक्य होईल. गर्भाशयाच्या कर्करोगाने दरवर्षी देशभरात तीन लाखांपेक्षा अधिक महिलांचा मृत्यू होतो. यापैकी ८५ टक्के महिला मध्यमवयीन आहेत. ही बाब लक्षात घेता केंद्र सरकारने केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये कर्करोगावर लक्ष केंद्रीत केले आहे. त्याच धर्तीवर आता मुंबई महानगरपालिकेनेही आरोग्य केंद्र, आपला दवाखान्यातील ३३ पॉलिक्लिनिक आणि ३० प्रसूतिगृहांमध्ये मुख, स्तन व गर्भाशय कर्करोगाची तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला आहे. फेब्रुवारीच्या अखेरीस प्रसूतिगृह व पॉलिक्लिनिकमध्ये या उपक्रमाला करण्यात येणार आहे, अशी माहिती मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शाह यांनी दिली. महिलांमधील कर्करोगाचे निदान वेळेत व्हावे यासाठी सामाजिक संस्थांची मदत घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महिला स्तन कर्करोग आणि गर्भाशय कर्करोगाची तपासणी करण्यास पटकन तयार होत नाही. त्यामुळे या महिलांना तपासणी केंद्रापर्यंत आणण्यासाठी कर्करोगासंदर्भात काम करणाऱ्या सामाजिक संस्थांची मदत घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे मॅमोग्राफीद्वारे तपासणी करण्यासाठी महिलांना विशेष कूपन दिले जाणार आहे, ज्यामुळे त्या खासगी केंद्रांमध्ये जाऊनही तपासणी करू शकतील, असेही डॉ. दक्षा शाह यांनी सागितले.

## मुंबई महानगरपालिकेला तीन नवे साहाय्यक आयुक्त


■ **मुंबई : राकेश गायकवाड**

पालिकेच्या पी उत्तर विभागात कुंदन वळवी, एफ उत्तर विभागात नितीन शुक्ला, तर बी विभागात शंकर भोसले यांची साहाय्यक आयुक्तपदावर नेमणूक केली आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेला तीन नवे साहाय्यक आयुक्त मिळाले आहेत. दरम्यान, साहाय्यक आयुक्तपदासह अतिरिक्त कार्यभार सांभाळणाऱ्या उपायुक्त किरण दिघावकर, संतोषकुमार धोंडे आणि पृथ्वीराज चौहाण यांची साहाय्यक आयुक्तपदावरून मुक्तता झाली. महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी २८ जून २०२४ रोजी एका दिवसात नऊ प्रशासकीय अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार देऊन प्रशासकीय जबाबदाऱ्या दिल्या होत्या. यामध्ये चार साहाय्यक आयुक्तांची प्रभारी उपायुक्त म्हणून पदोन्नती केली होती. तसेच त्यांना साहाय्यक आयुक्तपदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळण्याची जबाबदारी दिली होती. त्यामुळे संबंधितांना उपायुक्त आणि साहाय्यक आयुक्त अशी दोन्ही पदे सांभाळताना तारेवरची कसरत करावी लागत होती. मात्र, तीन विभागांमध्ये नवीन साहाय्यक आयुक्तांची नेमणूक झाल्यामुळे उपायुक्तांना दिलासा मिळाला. मुख्यालयातील घनकचरा व्यवस्थापन खात्यातील उपायुक्त व पी उत्तर विभागातील साहाय्यक आयुक्त किरण दिघावकर यांच्या जागेवर कुंदन वळवी, परिमंडळ – ६ चे उपायुक्त आणि साहाय्यक आयुक्त संतोषकुमार धोंडे यांच्या जागी शंकर भोसले व मुख्यालयातील मालमत्ता आणि एफ उत्तर विभागातील साहाय्यक आयुक्त पृथ्वीराज चौहाण यांच्या ठिकाणी नितीन शुक्ला यांची नेमणूक केली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून पालिकेत पदभरती आणि पदोन्नती रखडल्या होत्या. त्यामुळे सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांच्या जागेवर साहाय्यक आयुक्त व उपायुक्तांना प्रभारी म्हणून कार्यभार सोपवला. किरण दिघावकर हे पी उत्तर विभागात साहाय्यक आयुक्तपदासह घनकचरा खात्यात उपयुक्तपदावर कार्यरत होते, तर संतोषकुमार धोंडे हे बी विभागातील साहाय्यक आयुक्तपदासह परिमंडळ ६ मध्ये उपायुक्त म्हणून कार्यरत होते.

## पालिकेच्या महत्वाकांक्षी प्रकल्पांना राज्य सरकारच्या निधीची प्रतीक्षा,अधिमूल्यातील ५० टक्केच भाग महापालिकेला

■ **मुंबई : गणेश बागडे**

मुंबई महापालिकेने गेल्या काही वर्षात मोठ्या रकमेचे प्रकल्प हाती घेतले असून त्यापैकी काही प्रकल्पांना राज्य सरकारकडून निधीची प्रतीक्षा आहे. अतिरिक्त चटई क्षेत्रापोटी मिळणाऱ्या अधिमूल्यातील ७५ टक्के भाग महापालिकेला द्यावा अशी मागणी महापालिकेने केली आहे. तसेच मुद्रांक शुल्क नोंदणीमधून मिळणाऱ्या निधीचा काही भाग हा पालिकेच्या प्रकल्पासाठी मिळावा यासाठीही पालिकेचे प्रयत्न सुरु आहेत. मुंबई महापालिकेने गेल्या दोन तीन वर्षात मोठ्या रकमेचे अनेक प्रकल्प हाती घेतले असून पालिकेची विविध मोठमोठ्या प्रकल्पांची व विविध विकासकामांची देणी तब्बल २ लाख ३२ हजार कोटींच्या पुढे गेली आहेत. मात्र पालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत मात्र वाढलेले नाहीत. जकातीची नुकसान भरपाई, मालमत्ता कर आणि विकास नियोजन म्हणजेच पुनर्विकासातून मिळणारे उत्पन्न हे तीन पालिकेचे महत्त्वाचे उत्पन्नाचे स्त्रोत आहेत. दुसऱ्या बाजूला मालमत्ता कराच्या दरात दर पाच वर्षांनी होणारी सुधारणा गेली पाच वर्षे होऊ शकलेली नाही. त्यामुळे मालमत्ता करातून मिळणारे उत्पन्नही वाढलेले नाही. अन्य मार्गाने मिळणारे उत्पन्न हे तुटपुंजे आहे. त्यामुळे ही भरमसाठ देणी येत्या काही वर्षात पूर्ण करणे पालिका प्रशासनासाठी कठीण होत जाणार हे निश्चित आहे. त्यामुळे उत्पन्न वाढीसाठी पालिकेने विविध पर्याय अवलंबण्याचे ठरवले आहे. त्याबाबतची घोषणा पालिकेच्या आगामी अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. त्याचबरोबर पालिकेने राज्य सरकारकडेही मदतीचा



हात मागितला आहे. अतिरिक्त चटई क्षेत्रापोटी प्राप्त होणाऱ्या अधिमूल्यातील २५ टक्के भाग महापालिकेला मिळतो. मात्र ७५ टक्के हिस्सा महापालिकेला द्यावा अशी मागणी महापालिकेने केली होती. या अधिमूल्याच्या निधीचे चार भाग राज्य सरकार, महापालिका, धारावी पुनर्वसन प्राधिकरण, एमएसआरडीसी या चार प्राधिकरणांना दिले जातात. मात्र धारावी प्राधिकरण आता स्वतंत्र झाले असल्यामुळे त्यांचा हिस्सा महापालिकेला द्यावा अशी मागणी करण्यात आली होती. ती मान्य झाली असल्यामुळे पालिकेला आता ५० टक्के भाग मिळू लागला आहे. या आर्थिक वर्षात अधिकचे ७० कोटी महापालिकेला मिळाले आहेत. तर येत्या आर्थिक वर्षात ३०० कोटींचा महसूल मिळेल अशी अपेक्षा पालिका प्रशासनाला आहे. तसेच आणखी २५ टक्के हिस्सा मिळावा अशीही पालिका प्रशासनाने मागणी राज्य सरकारकडे केली आहे.

पान १ वरुन...

### लाडक्या बहिणींचे टेन्शन...

राज्य शासनाकडून प्रत्येक परिवहन विभागाकडून यादी घेऊन ती प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात आली. कुटुंबातील सासरे, दीर अथवा इतरांच्या नावावर कार असेल आणि लाभार्थी महिला पती, मुलांसोबत विभक्त राहत असेल तर त्यांना लाडकी बहीण योजनेचा लाभ सुरू राहणार असल्याचे महिला व बालविकास विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. लाडक्या बहिणीचा लाभ नको असेल तर तालुक्यातील बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, जिल्हयाचे महिला व बालकल्याण अधिकारी, जिल्हा महिला बालविकास अधिकारी कार्यालय या ठिकाणी लेखी अर्ज करत येणार आहे.

### 'मी CM झालो तेव्हा...

या प्रश्नावर फडणवीसांनी, 'चर्चा तुम्ही करता,' असं म्हटलं. पुढे बोलताना राज ठाकरेंच्या भेटीसंदर्भात फडणवीसांनी, 'ही कुठलीही राजकीय भेट नाही. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर राज ठाकरेंचा मला अभिनंदनाचा फोन आला. त्यावेळेस मी त्यांना मी सांगितलं होतं की मी घरी येईन. त्याप्रमाणे मी आज त्यांच्या घरी गेलो होतो,' असं सांगितलं. फडणवीस यांनी भेटीदरम्यान काय झालं याबद्दलची माहितीही दिली. 'मी त्यांच्या (राज ठाकरेंच्या घरी) घरी ब्रेकफास्ट केला. गप्पा मारल्या आणि मग या कार्यक्रमाच्या ठिकाणी आलो. या बैठकीचा किंवा आमच्या गप्पांचा कुठलाही राजकीय संबंध नाही. केवळ मैत्री करता मी त्यांच्या घरी गेलो होतो,' असं फडणवीसांनी स्पष्ट केलं आहे.

### पुण्यातील ५५ ठिकाणचे...

राज्यात पुणे विभागात जीबीएसचे सर्वाधिक १७६ रुग्ण आहेत. त्यात पुणे महापालिका ३७, महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेली गावे ८९, पिंपरी-चिंचवड महापालिका २६, पुणे ग्रामीण २४ आणि इतर जिल्हयांतील ८ रुग्ण आहेत. आतापर्यंत जीबीएसमुळे ६ जणांचा मृत्यू झाला आहे. जीबीएसच्या ४७ रुग्णांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून, २१ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. राज्यभरात ८९ रुग्ण बरे होऊन रुग्णालयातून घरी गेले आहेत. महापालिकेकडून नांदेडगाव परिसरातील चिकनचे नमुने तपासणीसाठी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत (एनआयव्ही) पाठविण्यात आले आहेत. याचबरोबर अन्न औषध व प्रशासनाने नांदेड गाव परिसरातील हॉटेलमधून खाद्यपदार्थांचे नमुने घेऊन ते तपासणीसाठी एनआयव्हीकडे पाठविले आहेत. याचबरोबर रुग्णसंख्या जास्त असलेल्या भागात आरोग्य विभागाकडून रुग्णांचे सर्वेक्षण सुरू आहे. पुणे महापालिकेने ४६ हजार ५३४ घरांचे सर्वेक्षण केले असून, पिंपरी-चिंचवड महापालिकेने २४ हजार ८८३ आणि पुणे ग्रामीणने १३ हजार २९१ अशा एकूण ८४ हजार ७०८ घरांचे सर्वेक्षण केले आहे.

### नाशिक ते पालघर १८०२०...

आमने येथे समृद्धी महामार्ग संपल्यावर एक जोड रस्त्यावरुन वसई, विरार, डहाणू, सुरतमार्गे वडोदरा व तेथून हा महामार्ग मुंबई-दिल्ली महामार्गाला जोडला जाणार आहे. हे दोन्ही महामार्ग वाढवण बंदराला जोडले जाणार आहेत. या अंतर्गतच नाशिक जिल्हयाला पालघरच्या वाढवण बंदराशी जोडण्यासाठी नवा महामार्ग बांधला जात आहे. पालघरमधील ३३ तर नाशिकमधील ९ गावांमधून हा महामार्ग जाणार आहे. जव्हार आणि मोखाडा तसेच नाशिकमधील त्र्यंबकेश्वर आणि इगतपुरी तालुक्यांमधून हा प्रस्तावित महामार्ग जाणार असल्यामुळे या क्षेत्रांमधील औद्योगिक, आणि आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. या महामार्गामुळे स्थानिक नागरिकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे नाशिक जिल्हयातील कृषी क्षेत्राला होईल मोठा फायदा होणार आहे. या द्रुतगती महामार्गाच्या प्रकल्पासाठी १८०२० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. या महामार्गामुळे वाढवण बंदर आणि इगतपुरी यांच्यातील अंतर एका तासात पार होणार आहे. 'बांधा-वापरा-हस्तांतरित करा' या तत्वावर हा महामार्ग उभारण्याचे नियोजन आहे.

## कोळीवाडे आणि गावठाणांमध्ये बायोमेट्रीक सर्वेक्षण नाही; झोपु प्राधिकरणाचे जाहिर निवेदनाद्वारे स्पष्टीकरण

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांमधील झोपडीधारकांचे बायोमेट्रीक सर्वेक्षण सुरू केले आहे. हे सर्वेक्षण, खासगी व्यक्ती, विकासक वा इतर कोणत्याही संस्थांकडून करण्यात येत नसून ते झोपु प्राधिकरणाकडून करण्यात येत असल्याचो सप्ष्टीकरण झोपु प्राधिकरणाने एका जाहीर निवेदनाद्वारे केले आहे. तर मुंबई क्षेत्रातील कोळीवाडे आणि गावठाणांमध्ये झोपु प्राधिकरणाकडून कोणतेही बायोमेट्रीक सर्वेक्षण केले जाणार नाही, असेही प्राधिकरणाने या जाहीर निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे. दरम्यान, झोपडीधारकांचे अधिकार अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने हे सर्वेक्षण अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे या सर्वेक्षणाला झोपडीधारकांनी सहकार्य करावे, असे आवाहन झोपु प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे. झोपडपट्टीमुक्त मुंबईचे उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने झोपु योजनांना गती देण्याचा निर्णय झोपु प्राधिकरणाने घेतला आहे.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग,**
**वरळी, मुंबई - ४०० ०१८.**

Email :- centralmumbai.ee@mahapwd.gov.in | ☎ ४९३६४०४/२४९३१९०२ फॅक्स २४९३१९०२

जा.क्र.का.अ./ममुंवि/ई-निविदा/ ५११ | दिनांक :- ३१/०१/२०२५

**ई निविदा सूचना क्रमांक १८ सन २०२४-२५ (शुध्दीपत्रक क्र.३)**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ सदर कामासाठी असलेल्या निविदा अटी व शर्ती प्रमाणे पात्रता प्राप्त अनुभवी कंत्राटदाराकडून **"इपीसी (अभियांत्रिकी, खरेदी व बांधकाम)** ( Engineering, Procurement and Construction)" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | मुंबई मंत्रालय परिसरात गार्डन गेट जवळ नवीन प्रशासकीय इमारतीचे (तळमजला + ७ मजले) बांधकाम करणे. | ९८.२८ |

**पूर्वी प्रसिध्द झालेले वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी- | दिनांक २९/०१/२०२५ रोजी १५.०० वाजता ते दिनांक ०४/०२/२०२५ रोजी १५.०० पर्यंत |
| ई-निविदा पुर्व बैठक- | दिनांक ३१/०१/२०२५ रोजी दुपारी १५.०० वाजता (मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई ४ था मजला, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांच्या दालनात) |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) - | दिनांक ०५/०२/२०२५ रोजी १५.०० वाजता (अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां) मंडळ विभाग, यांचे कार्यालय, ५ वा मजला,बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई) |

**करण्यात आलेले बदल**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ सदर कामासाठी असलेल्या निविदा अटी व शर्ती प्रमाणे पात्रता प्राप्त अनुभवी कंत्राटदाराकडून **"बी-२"** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | मुंबई मंत्रालय परिसरात गार्डन गेट जवळ नवीन प्रशासकीय इमारतीचे (तळमजला + ७ मजले) बांधकाम करणे. | ८६.४३ |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी- | दिनांक ०५/०२/२०२५ रोजी १५.०० वाजता ते दिनांक १२/०२/२०२५ रोजी १५.०० पर्यंत |
| ई-निविदा पुर्व बैठक- | दिनांक ०७/०२/२०२५ रोजी दुपारी १५.०० वाजता (मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई ४ था मजला, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांच्या दालनात) |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) - | दिनांक १४/०२/२०२५ रोजी १५.०० वाजता (अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां) मंडळ विभाग, यांचे कार्यालय, ५ वा मजला,बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई) |

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.

१.. http://mahapwd.gov.in 2. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)

३. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.


डीजीआयपीआर/२०२४-२०२५/६१२१

कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग,
वरळी, मुंबई.


## मनोज जरांगेचा मेव्हणा तडीपार; छगन भुजबळ म्हणाले, कायद्यासमोर सर्वच सारखेच..!

■ **मुंबई : गणेश बागडे**

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच मेव्हणा विकास खेडकर याच्यासह नऊ जणांना मराठवाडा पोलिसांनी तडापारीची कारवाई केली आहे. यावर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मेव्हण्यावर कारवाई झाली म्हणून



मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे. त्यावर बोलताना छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया देताना, कायद्यासमोर सर्वच सारखेच आहे, त्यामुळे चुकीच्या कामावर कडक कारवाई होणारच, असे म्हटले आहे. छगन भुजबळ आणि मनोज जरांगे यांच्यात आरक्षणाच्या मुद्यावर संघर्ष आहे. मनोज जरांगे यांनी ओबीसीमधून मराठा समाजाला आरक्षण मागितले आहे. ते त्यावर आजही ठाम आहे. जरांगे आता मागणीसाठी मुंबईत आंदोलन सुरू करणार आहे. ओबीसींचे आरक्षणाला संरक्षण मिळावे, यासाठी छगन भुजबळ मैदानात आहे. यातून दोघांमधील संघर्ष कायम धुसमत असतो. विधानसभा निवडणुकीपूर्वी हा संघर्ष टोकाला गेला होता.

छगन भुजबळ आणि मनोज जरांगे एकमेकांवर बोलण्याची कोणतीही संधी सोडत नाही. आता वाळू चोरीत मनोज जरांगे यांचा मेव्हाण विकास खेडकर याच्यासह नऊ जणांना मराठवाडा पोलिसांनी तडीपार केले आहे. त्यावर जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निशाणा साधताना, जहरी टीका केला. माझा आवाज दाबण्यासाठी हा प्रकार सुरू आहे. पण समाजासाठी आंदोलनाला बसलो आहे. तिथं आईवडिलांसह कोणत्याच नातेवाईकांना स्थान नाही, अशी भूमिका मनोज जरांगे यांनी मांडली. या कारवाईवर छगन भुजबळ म्हणाले, 'मी ऐकलं आहे. काय आपेक्षा आहे हे मला माहीत नाही. मात्र फडणवीसांनी त्यांना विचारावं, कोणा-कोणाला पकडलं पाहिजे ते! फडणवीस काय कोणाला आर्डर देत नाहीत. पोलिस करतात, काय करायचे ते डायरेक्ट! प्रत्येक गोष्टी गृहमंत्र्यांना विचारली जात नाही'.


**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सूचना

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दुरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां. विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. ब-१ को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक १०.२.२०२५ ते १७.२.२०२५ पर्यंत देण्यांत येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक १८.२.२०२५ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | यलोगेट पोलीस स्टेशन मुंबई येथील क्युआरटी इमारत आवार येथे तळमजल्यावरील प्लास्टर, फ्लोरींग, दरवाजे, खिडक्या इ. दुरुस्तीची कामे करणे. | ८,४३,६५४/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| २ | टाऊन हॉल आवार मुंबई येथील स्टाफ क्वार्टर्स येथे दुरूस्ती व वार्षिक देखभाल करणे. | ३,८९,८४१/- | ३,९००/- | १२ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ३ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील ३ मजल्यावरील विविध रुम येथे दुरुस्ती करणे. | ८,३६,४४१/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ४ | जुने जकात घर मुंबई भगतसिंग रोड कलेक्टर कार्यालय, अधिकारी खुर्ची प्रदान करणे व येथील दुरुस्ती करणे. | ३,५८,५२७/- | ३,६००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ५ | जे.जे. स्कुल ऑफ आर्ट आवारातील दक्षिण व उत्तर बाजूस नविन व जुने अप्लाईड आर्ट इमारत येथे दुरूस्ती करणे. (भाग- ५,६,७) | ६,८२,३४२/- | ६,९००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ६ | चर्चगेट मुंबई येथील मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशन, कफ परेड पोलीस स्टेशन, कुलाबा पोलीस स्टेशन, मेकर टॉवर ई - विंग, जनता दल, भाजप कार्यालय, मॅट कोर्ट, महात्मा गांधी मैदान येथे दुरूस्ती व वार्षिक देखभाल करणे. | ८,२३,६१६/- | ८,३००/- | १२ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ७ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील २ मजल्यावरील पॅसेज, जिना, रूम येथे दुरुस्ती करणे. | ८,३९,९६९/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ८ | जे.जे. स्कुल ऑफ आर्ट आवारातील दक्षिण व उत्तर बाजूस नविन व जुने अप्लाईड आर्ट इमारत येथे दुरुस्ती करणे.(भाग - ८,९,१०) | ६,६८,९२९/- | ६,७००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ९ | यलोगेट पोलीस स्टेशन मुंबई येथील मुख्य इमारत व अधिकारी निवासस्थान येथे दुरुस्ती व वार्षिक देखभाल करणे. | ८,४०,६९८/- | ८,५००/- | १२ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १० | ढोबी तलाव मुंबई येथील मानवी हक्क कमिशनर कोर्ट SIAC आवार येथे क्रेक फिलिंग, सॅनिटरी, वॉटर फिटींग, ड्रेनेज लाईन इ. दुरुस्तीची कामे करणे. | ५,१४,४७९/- | ५,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ११ | कारवार पोलीस स्टेशन मुंबई आवार वाजू कोटक मार्ग येथील क्रेक फिलिंग, सॅनिटरी, वॉटर फिटींग, ड्रेनेज लाईन इ. दुरुस्तीची कामे करणे. | ८,१७,६०५/- | ८,२०० | १२ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १२ | कारवार पोलीस स्टेशन कार्यालय मुंबई आवार येथील २ सब इस्पेक्टर क्वार्टर्स येथे दुरुस्ती व वार्षिक देखभाल करणे. | ४,२५,३०२/- | ४,३००/- | १२ महिने | ब-१ | रु. ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावार सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा.क्र. इशवि/निलि/ ९२८८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
इलाखा शहर विभाग, २ रा माळा,
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक :- ८/२/२०२५

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/६२३४

(व्ही. ए. पटेसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

प्रत :- उप अभियंता, दक्षिण, पश्चिम, मध्य उप विभाग आणि अधीक्षक आमदार निवास मुंबई यांना माहितीसाठी रवाना.
प्रत :- सुचनाफलक



# परिवहन विभागाचा मंत्री असल्यामुळे माझा निर्णय अंतिम, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**■ ठाणे : तृप्ती गोरे**

राज्य परिवहन महामंडळाच्या अध्यक्षपदी परिवहन विभागाचे सचिव संजीव सेठी यांची नियुक्ती करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अप्रत्यक्षपणे शिवसेना शिंदे गटावर कुरघोडी केल्याची चर्चा असून त्यावर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी ठाण्यात भाष्य केले आहे. परिवहन विभागाचा मंत्री असल्यामुळे माझा निर्णय अंतिम असेल, असे त्यांनी म्हटले आहे.

ठाणे महापालिका मुख्यालयात शुक्रवारी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विविध प्रकल्प कामांचा आढावा घेण्यासाठी एक बैठक घेतली. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी महामंडळाच्या अध्यक्षपदी परिवहन विभागाचे सचिव संजीव सेठी यांची नियुक्ती करण्यात आल्याच्या निर्णयावर भाष्य केले. राज्य परिवहन महामंडळाच्या कारभाराचा जो अध्यक्ष असतो, तो राजकीय व्यक्तीच असतो. मध्यंतरीच्या काळात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भरत गोगावले यांची महामंडळाच्या अध्यक्ष पदी नियुक्ती केली होती. परंतु गोगावले हे मंत्री झाल्यामुळे महामंडळाचे अध्यक्ष पद रिक्त झाले.

त्यामुळे या पदावर काम करण्याची संधी कुठल्यातरी राजकीय पक्षाच्या नेत्याला किंवा कार्यकर्त्याला मिळणार आहे. हि संधी उपलब्ध होईपर्यंत ती जबाबदारी तात्पुरत्या स्वरूपात परिवहन विभागाचे सचिव संजीव सेठी यांना देण्यात आली आहे. त्यामुळे त्याचे राजकीयदृष्ट्या कोणीही भांडवल करू नये, असे सरनाईक म्हणाले. मी त्या पदाचा प्रमुखच आहे. सगळी जबाबदारी माझीच आहे. ते केवळ एका महामंडळाच अध्यक्ष पद असते. त्यांनी कुठलेही काहीही निर्णय घेतले तरी ते शेवटी परिवहन खात्याचा मंत्री म्हणून मीच अंतिम निर्णय घेत असतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

लाडक्या बहिण योजनेसाठी सुरूवातीपासून निकष लावले होते. त्याच निकषाच्या आधारे जर कोणी गैरफायदा घेऊन जर पैसे घेतले असतील ते शासनाला परत द्यावे. किंबहुना ज्या लाडक्या बहिणींनी दोन दोन ठिकाणाहून अर्ज भरले होते, त्याच्या खात्या मध्ये १५०० रुपये जमा झाले होते. त्या बहिणींनी सुद्धा पैसे परत करण्याची तयारी स्थानिक संस्थांकडे अर्जाद्वारे दर्शविली आहे, असेही सरनाईक म्हणाले.

# शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देण्याची शासनाला शिफारस, रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी पत्र पाठविल्याने शेतकऱ्यांचा मोर्चा रद्द

**■ उरण : सचिन कदम**

विरार अलिबाग कॉरिडॉर बाधित शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मोबदल्यात वाढ करण्याची मागणी करण्यात आली होती. या संदर्भात रायगड जिल्हाधिकारी यांनी शासनाला येथील गावनिहाय दरवाढ करण्याची शिफारस करणारे पत्र पाठविले आहे. त्यामुळे उरणच्या शेतकऱ्यांनी शासना विरोधात कोकण आयुक्तालावर पुकारलेले आंदोलन मागे घेतले आहे.

आपल्या विविध मागण्यांसाठी अलिबाग विरार कॉरिडॉर बाधीत शेतकरी संघर्ष समितीने कोकण आयुक्त सीबीडी बेलापूर यांचे कार्यालयावर मोर्चा आयोजित केलेला होता. परंतु कोकण आयुक्तांच्या आदेशाने रायगड जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांच्या विनंती पत्रावरून बुधवारी अलिबाग येथे जिल्हाधिकार्यालयात उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)



समन्वयक भूसंपादन रायगड श्रीकांत गायकवाड यांच्या उपस्थितीत शेतकरी आणि अधिकारी यांची बैठक झाली. या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली आहे. तसेच उपजिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांनी नवे आदेश प्राप्त झाल्यावर आपल्या संघटनेसोबत त्वरित बैठक घेण्याचे मान्य केले आहे.

तसे लेखी पत्र त्यांनी संघटनेला देत पनवेल मेट्रो सेंटरचे भूसंपादन अधिकारी दत्तात्रेय नवले यांना महाराष्ट्र शासनाकडून मूल्यांकनाबाबत पुढील आदेश येत नाहीत तोपर्यंत अलिबाग विरार कॉरिडोर बाबत भूसंपादनाची कुठलीही प्रक्रिया न करता ती पुढील बैठकीपर्यंत स्थगित करण्यात यावे असे तोंडी आदेश दिले.

# १५ वर्षानंतर पालिका रुग्णालये झाली चकाचक, पालिकेने राबवली मेगा स्वच्छता मोहीम

**■ वसई : सुचिता देशमुख**

वसई विरार महापालिकेच्या स्थापनेनंतर १५ वर्षानंतर प्रथमच पालिकेच्या रुग्णालय आणि आरोग्य केंद्रांची स्वच्छता करण्यात आली. शनिवारी सर्व आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना साफसफाई करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर रुग्णालये आणि आरोग्यकेंद्राची साफसफाई करणे, भंगार साहित्य काढणे, अडगळीच्या जागा मोकळ्या करणे आदी कामे करण्यात आली.

वसई विरार महापालिकेची स्थापना जुलै २००९ साली झाली. महापालिकेची एकूण ७ रुग्णालये तसेच २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. या रुग्णालयांची आजवर स्वच्छता करण्यात आली नव्हती. सर्वत्र भंगार साहित्य पडलेले होते. न वापरलेली उपकरणे, साहित्य अडगळीत पडले होते. त्याचा मोठा ई कचरा जमा झाला होता. कागदपत्रांच्या रद्दीचे ढिगच्या ढिग साचले होते. दैनंदिन स्वच्छता वरवर करण्यात येत होती.पंखे देखील कधी पुसण्यात आले होते. सर्वत्र जळमटं साचली होती. यामुळे रुग्णालये आणि आरोग्य केंद्रे



बकाल बनून मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी येत होती. पालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांनी पाहणी केल्यानंतर ही दुरवस्था आढळली. ताबडतोब त्यांनी सर्व संबंधित रुग्णालयाचे प्रमुख, वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुग्णालये आणि आरोग्य केंद्रांच्या स्वच्छतेचे आदेश दिले. ही स्वच्छता मोहीम लवकरात लवकर घेण्याचे आदेश देताना मी कुठल्याही क्षणी पाहणी करेन आणि स्वच्छता न दिसल्यास कारवाई केली जाईल असा सज्जड दमच दिला होता. सोमवार ते शुक्रवार हा कामाचा व्यस्त दिवस असतो. त्यामुळे शनिवारचा दिवस साफसफाईसाठी निवडण्यात आला. सर्व आरोग्य विभागातील कर्मचारी या मेगा स्वच्छता मोहीमेत सहभागी झाले होते. सर्व ७ रुग्णालये आणि २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात एकाच वेळी ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. पंखो, खिडक्या पुसण्यात आल्या. जमीनी, परिसर, जीने धुण्यात आले. जळमटे काढण्यात आली. अडगळीत पडलेले साहित्य, न वापरलेली उपकरणे, रद्दी पेपर्स, जुन्या फाईली आदी काढण्यात आल्या. यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी समाधान व्यक्त केले. पालिकेच्या रुग्णालयात सर्वसामान्य रुग्ण येत असतात. त्यांना चांगली सेवा देणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे.

# नवी मुंबईत सिडकोचे घर पुनखरेदीची संधी, सिडकोच्या उच्चपदस्थांकडे प्रस्ताव विचाराधीन

**■ नवी मुंबई : धनश्री सट्टा**

नवी मुंबई परिसरामध्ये ज्यांचे स्वमालकीचे घर आहे, अशा व्यक्तींना आतापर्यंत सिडको महामंडळाच्या घर सोडतीमध्ये सहभाग घेता येत नव्हता, मात्र सिडको मंडळामध्ये काही उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या सूचनांनंतर ही अट शिथिल करण्यासाठी नवा प्रस्ताव बनविण्याचे काम सिडको मंडळाच्या पणन विभागात सुरू आहे. हा प्रस्ताव अद्याप प्राथमिक स्तरावर आहे. सिडकोच्या सोडतीमधील विक्रीविना शिल्लक घरांच्या विक्रीसाठी यामधून मोठा ग्राहक वर्ग मिळविण्यासाठी हा प्रस्ताव बनविण्याचे काम अंतिम टप्यात असल्याची माहिती सिडकोच्या विश्वसनीय सूत्रांनी दिली. सिडकोने अनेक सोडतींमध्ये यापूर्वीच घरे विक्रीसाठी उपलब्ध केली




आहेत, ती या योजनेतून खरेदी करण्याची संधी नवी मुंबई क्षेत्रात स्वताचे घर असणाऱ्या व्यक्तींना मिळणार आहे. सिडको महामंडळाने नवी मुंबईत ६७ हजार घरांचे बांधकाम पाच वर्षांपूर्वी हाती घेतले. मात्र ही ६७ हजार घरे बांधण्यापूर्वीच सिडकोच्या दफ्तरी सिडकोने बांधलेल्या विविध गृहप्रकल्पामधील हजारो घरे विक्रीविना शिल्लक आहेत. नुकत्याच काढलेल्या २६ हजार घरांच्या सोडतीला सिडकोच्या अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद मिळाला नसल्याने घरांमध्ये आणखी भर पडली आहे. केंद्र व राज्य सरकारची मर्जी राखण्यासाठी सिडको मंडळाला ६७ हजार घरांच्या बांधकामाचे उदिष्ट देण्यात आले. यासाठी सुमारे १५ हजार कोटी रुपये या गृह प्रकल्पाच्या बांधकामावर सिडको खर्च करत आहे. ही रक्कम सिडकोला कमी पडत असल्याने आतापर्यंत सिडकोने एसबीआय बँककडून ११२५ कोटी रुपये कर्ज घेतले आहे. त्याशिवाय नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसूचित प्रभाव क्षेत्र (नैना) प्रकल्प, खारघर तुर्भे लिंकरोड, मेट्रो मार्गिकेचे विस्तारित प्रकल्प, आंतरराष्ट्रीय विमानतळाला शहरांशी जोडणारे उलवा कोस्टल यांसारखी दळणवळणातील विविध रस्ते आणि उड्डाणपूल बांधण्याचे काम सिडको करीत आहे.

# मोघरपाडा येथील १७४ हेक्टर जमीन एमएमआरडीए हस्तांतरणाला मान्यता, मेट्रो कारशेडची होणार उभारणी

**■ ठाणे : संजय बोडके**

येथील मोघरपाडा येथे मेट्रो कारशेड उभारण्यात येत आहे. यासाठी लागणाऱ्या मौजे मोघरपाडा येथील १७४ हेक्टर जमीन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तर यातील बाधित आणि जमीन धारक शेतकऱ्यांना २२.५ टक्के मोबदला तर शासकिय जागांवर अतिक्रमण केलेल्या शेतकऱ्यांना देखील १२.५ टक्के मोबदला देण्यात येणार आहे. याबाबत राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि शेतकऱ्यांची ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक पार पडली. मोघरपाडा कारशेड जागेसंदर्भात आगरी, कोळी बांधवाच्या विकासाच्या दृष्टीने कुणावरही अन्याय होणार नसल्याचेही मंत्री सरनाईक यांनी यावेळी स्पष्ट केले. मौजे मोघरपाडा येथील सव्हे क्रमांक ३० येथील मेट्रो कार शेड उभारण्यात येणार

आहे. मात्र या ठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून शेती करण्यात येत आहे. यातील १६७ भाडेपट्टेधारक शेतकरी व ३१ अतिक्रमणधारक शेतकरी यांना विशेष नुकसान भरपाई योजना म्हणून शासनाने धोरण तयार केले आहे. तर कारशेड उभारणीसाठी लागणारी १७४.०१ हेक्टर जमीन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. जमिनीवरील पट्टेधारक शेतकरी तसेच अतिक्रमण धारकांची पात्रता जिल्हाधिकाऱ्यांनी निश्चित केली आहे. या अंतर्गत ज्या शेतकऱ्यांच्या नावावर जमीन आहे तसेच ज्या शेतकऱ्यांच्या नावावर जमीन नाही परंतु कब्जा आहे यांचा समावेश आहे. ज्या शेतकऱ्यांच्या नावावर सातबारा आहे, त्यांना २२.५ टक्के मोबदला शासनाच्या नियमानुसार देण्यात येईल.


महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सूचना

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां. विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. ब-१ कोऱ्या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक ७.२.२०२५ ते १४.२.२०२५ पर्यंत देण्यात येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक १७.२.२०२५ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जे. जे. स्कुल ऑफ आर्ट आवारातील दक्षिण व उत्तर बाजूस नविन व जुने अप्लाईड आर्ट इमारत येथे दुरुस्ती करणे. (भाग-२० व २१) | ४,६१,१३२/- | ४,७००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| २ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील १ मजल्यावरील पॅसेज, जिना, रुम येथे दुरुस्ती करणे. | ८,१८,८५९/- | ८,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ३ | यलोगेट पोलीस स्टेशन मुंबई येथील ३ मजल्यावरील प्लास्टर रंगकाम, दरवाजा, खिडक्या, फ्लोरींग दुरुस्ती करणे. | ८,४१,३२८/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ४ | मंत्रालय मुख्य इमारत मुंबई येथील रुम नं. ५०८ मध्ये स्टोरेज, टेबल, पॅनलिंग, खुर्च्या प्रदान करणे. | ६,१५,१२६/- | ६,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ५ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील १ मजल्यावरील विविध रुम येथे दुरुस्ती करणे. | ८,३७,१५३/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ६ | जुने जकात घर मुंबई भगतसिंग रोड धारावी कार्यालय आवार येथील अंतर्गत प्लास्टर, दरवाजा, खिडक्या, फ्लोरींग रंगकाम, दुरुस्ती करणे. | ८,३६,१७७/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ७ | जे.जे. स्कुल ऑफ आर्ट आवारातील दक्षिण व उत्तर बाजूस नविन व जुने अप्लाईड आर्ट इमारत येथे दुरुस्ती करणे.(भाग - १,२,३,४) | ८,३५,००८/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ८ | सिटी सिव्हील कोर्ट मुंबई येथील दक्षिण बॅरेक कोर्ट रुम ६५ येथे पॉलिश व रंगकाम करणे. | ४,१५,३८७/- | ४,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ९ | जे. जे. स्कुल ऑफ आर्ट आवारातील दक्षिण व उत्तर बाजूस नविन व जुने अप्लाईड आर्ट इमारत येथे दुरुस्ती करणे.(भाग-११,१२,१३) | ७,२६,७९९/- | ७,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १० | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील ५ मजल्यावरील विविध रुम येथे दुरुस्ती करणे. | ८,३५,३७१/- | ८,४००/ | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ११ | धोबी तलाव मुंबई येथील सिव्हील डिफेंस परपज मानिकजी टेक्नीकल सेंटर येथे क्रेक फिलिंग, सॅनिटरी, वॉटर फिटींग, ड्रेनेज लाईन इ. दुरुस्तीची कामे करणे. | २,९९,३१७/- | ३,०००/- | ४ महिने | ब-१ | रु. ३३६/- |
| १२ | मंत्रालय मुंबई ६ मजल्यावरील एसीएस येथील पीए आणि स्टाफ एरिया येथे नुतनीकरण करणे. | ४,११,७५५/- | ४,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १३ | एन. डी. रोड मुंबई येथील सॅनिटरी, प्लंबिंग फिटींग, हार्डवेअर मटेरीअल, सप्लाईंग लेबर येथे दुरुस्ती व वार्षिक देखभाल करणे. | ६,९९,७२७/- | ७,०००/- | १२ महिने | ब-१ | रु. ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा.क्र. इशवि/निलि/ ७७५४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
इलाखा शहर विभाग, २ रा माळा,
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक :- ३/२/२०२५

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/६१८७

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

प्रत :- उप अभियंता, दक्षिण, पश्चिम, मध्य उप विभाग आणि अधीक्षक आमदार निवास मुंबई यांना माहितीसाठी रवाना.
प्रत :- सुचनाफलक



महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, यांचेकार्यालय
Email :- integratedmumbai.ee@mahapwd.com
दुरध्वनी क्र. २२०१६९७४ फॅक्स क्र. २२०१६९७६
ई-निविदा सुचना क्र.५३ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ (दुरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४-७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकामखात्याकडून योग्यत्या वर्गातील नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थांकडून (फक्त बृहन्मुंबई शहर) खालील कामांकरीत "ब-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंत, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, फोर्ट, मुंबई, यांनी राखून टेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदिजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | मुंबईतील श्री जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटलमधील मुख्य इमारतीतील मेक शिफ्ट ओ.टी. चे अपग्रेडेशन. | ३२०८७८१/- |
| २ | मुंबईतील जे.जे. हॉस्पिटल कंपाऊंडमधील तळमजल्यावरील हॉस्पिटल पेशंट किचन (मास) मध्ये प्लास्टरिंग आणि पेंटिंग केले आणि ते लागू केले. | १२५१४१६/- |
| ३ | वार्षिक देखभाल आरोग्य भवन इमारत, पीडब्ल्यूडी सेंट जॉर्जेस सेवा केंद्र, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल कॅम्पस, मुंबई येथील इलेक्ट्रिकल उपविभाग. (दारे आणि खिडक्यांच्या फिक्स्चर आणि फास्टनिंगची दुरुस्ती) | १२४०४७९/- |
| ४ | सर जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल, मुंबई येथील फिजियोलॉजी इमारतीच्या बाह्य दर्शनी भागाचे जीर्णोद्धार आणि संवर्धन. | २३९११६१/- |

(एकूण ०४ कामे)

ई-निविदाउपलब्धकालावधी : दि. १०/०२/२०२५ सकाळी १०.३० पासून ते दि.२४/०२/२०२५ रोजी १५.०० पर्यंत
ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दि. २७/०२/२०२५ रोजी १५.०५ वाजता

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. १. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in ३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.एघ(सा.बां.)/निविदा/ ६५२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन,
२ रा मजला, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनीक्र. ०२२-२२०१६९७४/७६
दिनांक : ०६-०२-२०२५

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
मुंबई-४०० ००१.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/६२८९



सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना क्र.४८ सन २०२४-२५

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४/७६ हे खालील कामे सा.बां. विभाग सुशिक्षित बेरोजगार अभियंता, यांचेसाठी मागवित आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक ०४/०२/२०२५ ते दिनांक १८/०२/२०२५ दुपारी १५.०० पर्यंत देण्यात यईल. भरुन पाठविलेल्या निविदा २१/०२/२०२५ रोजी त्यादिवशी दुपारी १५.०५ वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नाव | अंदाजित किंमत (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | वर्ग | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्यची किंमत अंदाजित किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Providing and fixing grills to 300 Side for safety purpose in Main Building at Sir J.J. Hospital Compound, Mumbai. | ८३५७७३/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| २ | Repairs and renovation of Sister's and staff toilet block to ward no.41 at Main Hospital Building at Sir J.J. Group of Hospital, Mumbai. | ६९३१३०/- | ७०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ३ | Repairs and renovation of computer room (Residential Dr. Room) on 1st floor at Main Hospital Building at J.J. Hospital Compound, Mumbai. | ९३२९६८/- | १००००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ४ | Repairs of store room, medicine storage godown at fifth floor at Sir J.J. Hospital Compound, Mumbai. | ६८५१६१/- | ७०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ५ | Providing invisible grill to 5th and 6th floor balcony for safety purpose in Main Building at Sir J.J. Hospital Compound. Mumbai. | ८२९७७८/- | ७०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ६ | Repairs and repainting-replaster to surgery ward passage at Main Hospital Building at Sir J.J. Group of Hospital, Mumbai. | ८१०७७९/ | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ७ | Providing and fixing grills to LHS wards for safety purpose in Main Building at Sir J.J. Hospital Compound, Mumbai. | ८१३१०८/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ८ | Providing Invisible grill from 1st floor to 5th floor verandah for safety purpose in Main Building at Sir J.J. Hospital Compound, Mumbai. | ७५७२७३/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ९ | Renovation of Auto Clave room at Sir J.J. Group of Hospital Compound. Mumbai. | ७२९२६६/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १० | Repairs and renovation of sterilizer room at Sir J.J. Group of Hospital, Mumbai. | ७३१७६०/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सुचना फलकावर सविस्तर निविदा सुचना पहावयास मिळेल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे.

जा.क्र.एघ(सा.बां.)वि/निविदा/ ५४२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (स.बां.) विभाग,
२ रा मजला, बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, मुंबई.
दिनांक :३१-०१-२०२५

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/६१२३

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
फोर्ट, मुंबई.

# एमएमआर ग्रोथ हबसाठी अंमलबजावणी कक्षनियोजन विभागाकडून स्थापना, आर्थिक विकास वाढीसाठी अनेक प्रकल्प



■ मुंबई : मेहुल गायकवाड

मुंबई महानगर प्रदेशाचा (एमएमआर) विकास ग्रोथ हब म्हणून करण्यात येणार आहे. यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (एमएमआरडीए) अंमलबजावणी प्राधिकरण (नोडल एजन्सी) म्हणून नियुक्ती केली आहे. एमएमआरडीएने ग्रोथ हबचा आराखडा तयार केला आहे. आता त्याची अंमलबजावणी करण्यासाठी नियोजन विभागाकडून राज्यस्तरीय प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची स्थापना केली आहे.

गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एकूण नऊ सदस्यांचा अंमलबजावणी युनिटमध्ये समावेश आहे. निती आयोगाने देशाच्या आर्थिक विकास वाढीसाठी सुरत, विशाखापट्टणम, वाराणसी आणि एमएमआर या चार महानगरांचा विकास ग्रोथ हब संकल्पनेनुसार करण्याचा निर्णय घेतला आहे. या ग्रोथ हबअंतर्गत आर्थिक विकास वाढीच्या अनुषंगाने अनेक प्रकल्प राबविले जाणार आहेत. औद्योगिक विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने भविष्यात येथे अनेक प्रकल्प आणले जाणार आहेत. निवासी, व्यावसायिक संकुलांचीही निर्मिती केली जाणार आहे. बंदर विकास, मरिना, फिल्मसिटी उभारणी आदी प्रकल्पांचा त्यात समावेश असण्याची शक्यता आहे. 'ग्रोथ हब'मध्ये रोजगार वाढीवरही भर दिला जाणार आहे. येत्या काळात एकूणच एमएमआरचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक विकास केंद्र म्हणून विकास केला जाणार आहे. या ग्रोथ हबचा सविस्तर आराखडा एमएमआरडीएकडून तयार करण्यात आला आहे. आता या आराखड्याची अंमलबजावणी करून एमएमआरचा ग्रोथ हब म्हणून विकास करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने एक पाऊल पुढे टाकले आहे. नियोजन विभागाने ४ फेब्रुवारीला प्रसिद्ध केलेल्या शासन निर्णयानुसार आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय प्रकल्प अंमलबजावणी युनिटची स्थापना केली आहे. मुंबई महानगरातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी विविध प्रकल्पांचा समावेश करण्यात येणार आहे.

## अनिल अंबानींना न्यायालयाचा दिलासा; कॅनरा बँकेच्या आदेशाला स्थगिती, कारवाईबाबत आरबीआयला विचारणा

■ मुंबई : गणेश बागडे

उद्योगपती अनिल अंबानी यांच्या कंपनीचे कर्ज खाते फसवे असल्याचे जाहीर करण्याच्या कॅनरा बँकेच्या आदेशाला उच्च न्यायालयाने शुक्रवारी स्थगिती दिली. त्याचवेळी, पक्षकार किंवा कर्जदारांचे म्हणणे न ऐकता कर्ज खाते फसवे असल्याचे जाहीर करणारे आदेश काढणाऱ्या बँकांवर काय कारवाई करणार, अशी विचारणा न्यायालयाने रिझर्व्ह बँकेला करून त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.

अंबानी यांनी कंपनीचे कर्ज खाते फसवे असल्याचे जाहीर करण्याच्या कॅनरा बँकेच्या मार्च २०२४च्या आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. आपली बाजू न ऐकताच बँकेने हा आदेश काढल्याचा दावा अंबानी यांच्या वतीने करण्यात आला. त्यासाठी अंबानी यांच्यातर्फे सर्वोच्च न्यायालयाच्या या बाबतच्या आदेशाचा दाखला देण्यात आला. त्याची दखल घेऊन न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले



यांच्या खंडपीठाने कॅनरा बँकेच्या आदेशाला स्थगिती दिली. रिलायन्स कम्युनिकेशन्स संबंधित हे प्रकरण असून कंपनी दिवाळखोरीत काढण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, रिझर्व्ह बँकेने गेल्या वर्षी ८ नोव्हेंबर रोजी काढलेल्या आदेशानुसार, अंबानी यांच्या कंपनीबाबत निर्णय घेण्यात आला होता. रिझर्व्ह बँकेच्या आदेशाने, बँकांना कोणतेही खाते फसवे खाते म्हणून घोषित करण्याची परवानगी देण्यात आली होती आणि त्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली होती. असे असतानाही रिझर्व्ह बँक आणि सर्वोच्च न्यायालयाच्या या संदर्भातील निर्णयाचे बँकांकडून वारंवार उल्लंघन केले जात आहे. त्याबाबतची अनेक प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. रिझर्व्ह बँक अशा बँकांवर कारवाई करण्यास बांधील नाही का, असा प्रश्न न्यायालयाने केला. तेलंगणा उच्च न्यायालयाने रिझर्व्ह बँकेचा आदेश रद्दबातल ठरवला होता. या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यावेळी, न्यायालयाने रिझर्व्ह बँकेच्या आदेशाशी संबंधित मुद्दे विचारात घेत उच्च न्यायालयाचा आदेश योग्य ठरवला.

## महानगर प्रदेशात आंतरराष्ट्रीय दर्जाची सात व्यापार केंद्रे

■ मुंबई : सम्यक कासारे

मुंबई महानगर प्रदेशाचा (एमएमआर) 'ग्रोथ हब' म्हणून विकास करण्यात येणार असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) त्याचा अंतिम आराखडा तयार केला आहे. या आराखड्यानुसार येत्या



काही वर्षात एमएमआरमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची सात व्यापार केंद्रे निर्माण केली जाणार आहेत. आर्थिक विकास केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वांद्रे- कुर्ला संकुलासह कुर्ला- वरळी, विरार- बोईसर बुलेट ट्रेन स्थानक परिसर, गोरेगाव चित्रनगरी, खारघर आणि नवी मुंबई ऐरोसिटीचा त्यात समावेश आहे. देशाची अर्थव्यवस्था पाच लाख कोटी डॉलरवर नेण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने ठेवले आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी केंद्राने देशातील चार महानगरांचा विकास आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र म्हणजेच ग्रोथ हब म्हणून करण्याचा निर्णय घेतला आहे.

वांद्रे-कुर्ला संकुल : जी ब्लॉकमधील २० हेक्टर जागेचा विकास केला जाणार. येथे निवासी, व्यावसायिक संकुल, मॉलसह इतर सेवा विकसित केल्या जाणार.

कुर्ला- वरळी : कुर्ल्यातील १०.५ हेक्टर जागेचा निवासी संकुलासह हॉटेल, व्यावसायिक संकुल म्हणून विकास. वरळीतील ६.४ हेक्टर जागेचा कार्यालय, हॉटेल, रुग्णालय आणि मनोरंजन केंद्र म्हणून विकास.

## ६ एप्रिलपर्यंत जात प्रमाणपत्र सादर करण्याची मुभा ; 'एसईबीसी' आणि ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अंतिम संधी

■ मुंबई : नितीन देवळेकर

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (एसईबीसी) आणि मागास प्रवर्गातून (ओबीसी) २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी कक्ष) ६ एप्रिल २०२५ पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुभा दिली आहे. प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या अर्जाच्या पावतीच्या आधारावर प्रवेश निश्चित केले होते. अशा विद्यार्थ्यांना यामुळे दिलासा मिळाला आहे. सीईटी कक्षामार्फत २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात राबविलेल्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत एसईबीसी आणि ओबीसी प्रवर्गातून विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या अर्जाची पावती प्रवेश घेताना सादर केली होती. या पावतीच्या आधारावर महाविद्यालयांत विद्यार्थ्यांचे प्रवेश



निश्चित करण्यात आले होते. या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली होती. काही विद्यार्थ्यांनी विहित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले. अनेकांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे शक्य झालेले नाही. अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून सीईटी कक्षाने विद्यार्थ्यांना ६ एप्रिल २०२५ पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुभा दिली आहे. अद्याप जात वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशा विद्यार्थ्यांनी संबंधित जात पडताळणी कार्यालयाशी संपर्क साधावा आणि दिलेल्या मुदतीमध्ये जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून ते ऑनलाइन सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर अपलोड करावे. संबंधित संस्था किंवा महाविद्यालयात जमा करावे, त्याचप्रमाणे ज्या विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र संस्थेत किंवा महाविद्यालयात जमा केले आहे, त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र ऑनलाइन अपलोड करण्यात आले आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी, अशा सूचना सीईटी कक्षाकडून करण्यात आल्या आहेत.

## म्हाडा भूखंडावरील ३७ गृहनिर्माण संस्थांकडून ७० हून अधिक सदनिका हडप!

■ मुंबई : विशाल कारंडे

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (भूखंड वितरण) विनियम १६ अन्वये वितरित झालेल्या भूखंडावर उभारण्यात आलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांनी एकूण दहा टक्के सदनिका शासन आणि म्हाडाला सुपूर्द करणे आवश्यक होते. परंतु आतापर्यंत ५८ पैकी ३७ गृहनिर्माण संस्थांनी ७० हून अधिक सदनिका शासन तसेच म्हाडाला सुपूर्द न करता त्याची परस्पर विल्हेवाट लावल्याची बाब उघड झाली आहे. राज्य शासनाने या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार अहवाल सादर केला असून त्यात ही माहिती देण्यात आली आहे.

टिळक नगर येथील गृहनिर्माण संस्थेने म्हाडा कायद्यातील तरतुदीनुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांनी दहा टक्के सदनिका शासन आणि म्हाडाला हस्तांतरित केलेल्या नाही, याबाबत २०१६ मध्ये न्यायालयात याचिका दाखल




झाली होती. या याचिकेच्या सुनावणीच्या वेळी अशा ६७ सहकारी गृहनिर्माण संस्था असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी चौकशी अहवाल सादर करावा, असे आदेश न्यायालयाने जून २०२३ मध्ये दिले होते. त्यानुसार गृहनिर्माण विभागाने एक सदस्यीय समिती नियुक्त केली होती. या समितीने आपला अहवाल न्यायालयाला सादर केला आहे.

या अहवालात म्हटले आहे की, अशा ६७ नव्हे तर ५८ गृहनिर्माण संस्था असून त्यापैकी दहा संस्थांना भूखंडाचे वितरण झालेले नाही वा बांधकाम सुरू न झाल्याने वगळण्यात आले आहे. उर्वरित ४८ पैकी ३७ गृहनिर्माण संस्थांनी दहा टक्क्यांनुसार ९० सदनिका शासनाला तर १८ सदनिका म्हाडाला सुपूर्द करणे आवश्यक होते. त्यापैकी शासनाला फक्त ३७ सदनिका उपलब्ध झाल्या आहेत तर म्हाडाला एकही सदनिका मिळालेली नाही, असे या अहवालात म्हटले आहे. या अहवालाची प्रत 'लोकसत्ता'कडे आहे. यापैकी अनेक गृहनिर्माण संस्थांच्या करारनाम्यात अशी अट शासन वा म्हाडाने टाकली नसल्याची तसेच काही प्रकरणात शासन व म्हाडाने आपल्या पातळीवर रक्कम आकारूनही अट शिथील केल्याची गंभीर बाबही या निमित्ताने उघड झाली आहे.

या प्रकरणी दाखल तक्रारीत तथ्य असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. मात्र ज्या गृहनिर्माण संस्थांनी दहा टक्के सदनिका सुपूर्द केलेल्या नाहीत, त्यांच्यावर कारवाईची शिफारस करण्यात आलेली नाही. मात्र अशा गृहनिर्माण संस्थांना भविष्यात पुनर्विकासासाठी परवानगी देताना त्यांच्याकडून या सदनिका ताब्यात घ्याव्यात, असे सुचविण्यात आले आहे. मात्र ज्या भूखंडावर बांधकाम सुरू झालेले नाही, अशा भूखंडधारकांना तात्काळ सूचना देण्याचेही या अहवालात नमूद आहे.

दहा टक्के सदनिकांची अट न पाळलेल्या संस्था : निटी कर्मचारी, गुरुकृपा, आयआयटी, अंजय (कोपरी, पवई), शिवांजली, आकाशगंगा, श्री साई (ओशिवरा), वरळी सिटीझन (आदर्श नगर, वरळी), साई आदित्य (डी. एन. नगर, अंधेरी पश्चिम), जय महाराष्ट्र वास्तु विकास, अंधेरी पश्चिम), चंद्रमा (पहाडी गोरेगाव) आदी.


**महाराष्ट्र शासन**
इलाखा शहर विभाग, (सा.बां.)
**ई -निविदा सुचना क्र. ७४ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थाकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मार्गवित आहेत.निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | मुंबई येथील कोर्ट आवार गेट ३ मधील दक्षिण बॅरेक २ येथे फ्लोरींग व सॅनिटरी फिटींगची दुरुस्ती करणे. | १६.८६ |
| २ | महापालिका मार्ग मुंबई येथील आझाद मैदान पोलीस स्टेशन येथे सिमेंट कॉक्रीट रोड (बीएमसी बाजूस) दुरुस्ती करणे. | ४९.९७ |
| ३ | एल्फिस्टन टेक्नीकल हायस्कुल मुंबई येथील आवार नविन पॉलिटेक्नीक इमारत येथे सिमेंट कॉक्रीट रोड चे काम करणे. | १३.६० |
| ४ | एल्फिस्टन हायस्कुल इमारत मुंबई येथील रुम नं. २२० येथे फ्लोरींग व फर्निचर काम दुरुस्ती करणे. | १२.६५ |
| ५ | महापालिका मार्ग मुंबई येथील चिफ मॅट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट कोर्ट आवार येथे कंपाऊंड वॉल चे नुतनीकरण करणे. | २०.९५ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. ७.२.२०२५ ते दि. १४.२.२०२५ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. १७.२.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/ ७७५३
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : ३/२/२०२५

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/६१८६



## वसई-विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)
मुख्य कार्यालय विरार
दूरध्वनी क्र. १२२५०-२४०२१७९/२४०२५६३

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | निळेमोरे-७ | NL३०/३७२/६५ | ५०५६ | गिता नरेंद्र भट | किरण सत्यकुमार तिवारी/ सत्यकुमार तिवारी |
| २. | निळेमोरे-७ | NL३०/३८५/३५ | ५७२० | राजु रामदास अगरवाल व जेटी | जितेंन्द्र कुभार पाण्डेय / सचिन पाण्डेय |
| ३. | निळेमोरे-७ | NL३०/३७०/१२६ | ५२५४ | शलाका सागर म्हात्रे | ब्रिजेश रामलखन यादव |
| ४. | निळेमोरे-७ | NL३०/३७०/६४२ | ५२४६ | अभिषेक वर्तक | विनोद भाईलाल गुप्ता |
| ५. | निळेमोरे-७ | NL३०/२८३/१६ | ५०६२ | सचिन अविनाश नार्वेकर | भरत गोपाळ मुडे व शिल्पा भरत मुडे |
| ६. | निळेमोरे-७ | NL३०/३७०/४३६ | ५१८८ | डी.जी. एस. डेव्ह. | ममता गिरी व प्रदिपकुमार गिरी |
| ७. | निळेमोरे-७ | NL३०/३६४/४४ | ५०६६ | अजय प्रताप गिरी | अनुराधा सामल / आशिष कुमार सामल |
| ८. | निळेमोरे-७ | NL३०/३४१/९ | ५१४४ | प्रणाली निमकर | सुनीता राय व धर्मेन्द्र कुमार राय |
| ९. | निळेमोरे-७ | NL३०/३२३/७६ | ५११६ | प्रविण भगवानराम भड | अतिश आत्माराम गोरीवले व ओवी गोरीवले सपना |
| १०. | निळेमोरे-७ | NL३०/३२४/२९ | ५११२ | प्रदिप राजाराम पवार | हर्षद महान्दी व विशाल हर्षल महान्दी |
| ११. | निळेमोरे-७ | NL३०/४०५/१२५ | ५०९४ | सिमा माणिक पाटील | महेश प्रसाद विश्वकर्मा व अनिल शर्मा व आशिष शर्मा |
| १२. | निळेमोरे-७ | NL३०/३०५/१४ | ५२७९ | सरोज उत्तम चौगले | राजेश गंगाराम उतेकर व लक्ष्मी राजेश उतेकर |
| १३. | निळेमोरे-७ | NL३०/३७०/४७५ | ५२५० | डी.जी. एस. डेव्ह. | चंदन सुरेशचंद्र गुप्ता व रिना चंदन गुप्ता |
| १४. | निळेमोरे-७ | NL३०/३७०/२०१ | ५२५२ | डी.जी. एस. डेव्ह. | महेंद्र हरिश्चंद्र पवार |
| १५. | निळेमोरे-७ | NL३०/३७०/७७ | ५२४८ | अमित जे सिंग | प्रशांत अरुण तिवारी व प्रकाश तिवारी |
| १६. | निळेमोरे-७ | NL३०/३७०/२९९ | ५२४७ | डी.जी. एस. डेव्ह. | मनोजकुमार सेठ वरानी शेठ |
| १७. | निळेमोरे-७ | NL३०/२८४/७१ | ५२६६ | संचु पाण्डये | स्वाती गुप्ता / रविंद्र गुप्ता |
| १८. | निळेमोरे-७ | NL३०/३७०/१४९ | ५२५८ | डी.जी. एस. डेव्ह. | सत्यप्रकाश गुप्ता / रजनी गुप्ता |
| १९. | निळेमोरे-७ | NL३०/३७०/४४१ | ५२४४ | डी.जी. एस. डेव्ह. | साझी समीर गायकर |
| २०. | निळेमोरे-६ | NL२९/१८७/९४ | - | साई शक्ती डेव्ह. | रेखा विशाल कामत |

जावक क्र..: व.वि.श.म./क.वि. २६०/२४/२५
दिनांक: ०७-०२-२०२५

(अश्विनी मोरे)
सहाय्यक आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा


## फेरीवाल्यांना अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य; महानगरपालिकेला भूमिका स्पष्ट करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

■ मुंबई : विशाल कारंडे

पदपथावर व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांकडे अधिवास प्रमाणपत्र (डोमसाईल) असणे आवश्यक आहे. राज्यात कोणीही येऊन व्यवसाय करू शकत नाही, अशी टिप्पणी उच्च न्यायालयाने शुक्रवारी केली. तसेच, इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही फेरीवाल्यांना अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य करण्याचे मत मांडून त्यावर महानगरपालिकेला भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. शहर फेरीवाला समिती (टीव्हीसी)



निवडणुकीला आव्हान देणाऱ्या याचिकांवरील सुनावणीच्या वेळी न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने उपरोक्त मत मांडले. टीव्हीसीच्या निवडणुकीसाठी ७० हजारहून अधिक नोंदणीकृत मतदारांना वगळण्यात आल्यामुळे अंतिम मतदार यादीत केवळ २२ हजार मतदारांचा समावेश होता. तसेच, अनेकांना अधिवास प्रमाणपत्र नसल्याने अपात्र ठरवण्यात आल्याची बाब याचिकाकर्त्यांच्या वतीने सांगण्यात आल्यावर देशातील अनेक राज्यांमध्ये व्यवसाय करण्यासाठी लागू केलेल्या पात्रता निकषांमध्ये अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. असे असताना आपल्याकडे फेरीवाल्यांना अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य का केले जात नाही, अशी विचारणा खंडपीठाने केली. त्याचवेळी, राज्यात एकसमान फेरीवाले धोरण अस्तित्वात आहे का? फेरीवाल्यांची संख्या कमी होण्यामागील कारणे काय, अशी विचारणा न्यायालयाने केली.


**महाराष्ट्र शासन**
कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, यांचे कार्यालय
**Email :- integratedmumbai.ee@mahapwd.com**
दुरध्वनी क्र. २२०१६९७४ फॅक्स क्र. २२०१६९७६
**ई-निविदा सुचना क्र. ४७ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ (दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत अंतर्गत सजावट कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता 'ब-१' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | मुंबईतील जी.टी. हॉस्पिटल कंपाऊंड येथे लाकडी डायस, खोट्या छताच्या स्टेज अकॉस्टिक पॅनेलिंगचे काम देऊन एमआयडीसी हॉलचे व्याख्यान हॉलचे नूतनीकरण करणे. | ४२२८६६५/- |
| २ | मुंबईतील जी.टी. हॉस्पिटलमध्ये व्याख्यान कक्ष म्हणून एमआयडीए हॉलमध्ये फरशी, दरवाजा, खिडक्या आणि प्लास्टर पेंटिंगची दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | ४३०८७१९/- |
| ३ | बंधकाम भवन, मुंबई येथे दुस-या मजल्यावरील बी विंगमधील शौचालय आणि केबिनची दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | १९३७८०५/- |

(एकूण ०३ कामे)

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि. ०४/०२/२०२५ सकाळी १०.३० पासून ते दि. १८/०२/२०२५ रोजी १०.०० पर्यंत
ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दि. २१/०२/२०२५ रोजी १०.०५ वाजता

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in
३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, फोर्ट मंबई कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.एघ(सा.बां.)/निविदा/ ५७३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन,
२ रा मजला, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४/७६
दिनांक : ३१/०१/२०२५

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
मुंबई-४०० ००१.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/६१२४

# पत्राचाळीतील घरांचा ताबा; म्हाडाच्या मुंबई मंडळातील ६२९ घरांसाठी १६ फेब्रुवारीला सोडत

**मुंबई : राकेश गायकवाड**

गोरेगाव पश्चिम येथील सिद्धार्थनगर अर्थात पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पातील मूळ भाडेकरूंच्या ६७२ घरांचा समावेश असलेल्या पुनर्वसित इमारतींना नुकताच निवासी दाखला (ओसी) मिळाला आहे. त्यामुळे आता या घरांच्या वितरणाचा मार्ग मोकळा झाला असून पत्राचाळवासीयांची १७ वर्षांपासूनची हक्काच्या घराची प्रतीक्षा अखेर आता संपुष्टात आली. म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून मूळ भाडेकरूंना घरांचा ताबा देण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल उचलण्यात आले आहे. त्यानुसार १६ फेब्रुवारीला ६७२ घरांपैकी ६२९ घरांसाठी मंडळाकडून सोडत काढली जाणार आहे. त्यानंतर प्रत्यक्ष घराचा ताबा देण्यासंबंधीची कार्यवाही केली जाणार आहे. एका खासगी विकासकाने २००७ मध्ये पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्प हाती घेतला होता. २००८ मध्ये येथील ६७२ घरे रिकामी करून इमारतींचे पाडकाम करण्यात आले. मात्र, काही वर्षांनंतर पुनर्विकास बंद पडला. विकासकाने काम अर्धवट सोडले आणि त्यानंतर विकासकाने या पुनर्विकासात मोठा आर्थिक गैरव्यवहार केल्याची बाब सिद्ध झाली. त्यानुसार




विकासकाविरोधात कठोर कारवाई करून हा पुनर्विकास प्रकल्प राज्य सरकारने म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या ताब्यात दिला.

दरम्यान, प्रकल्प वादात अडकल्याने, प्रकल्प अपूर्ण राहिल्याने मूळ भाडेकरूंची चिंता वाढली होती. मात्र अखेर मुंबई मंडळाने अपूर्ण स्थितीतील पुनर्वसित इमारतींसह मुंबई मंडळाच्या २०१६ च्या सोडतीतील ३०५ घरांचा समावेश असलेल्या इमारतीच्या कामाला सुरुवात केली. नुकतीच ही कामे पूर्ण झाली असून सोडतीतील इमारतीसाठी निवासी दाखला प्राप्त करून घेण्यात आला आहे. तर या इमारतीतील ३०५ विजेत्यांना घराचा ताबा देण्यास सुरुवात केली आहे. आता पत्राचाळीतील मूळ भाडेकरूंचीही हक्काच्या घरांची प्रतीक्षा जवळपास संपुष्टात आली आहे. पुनर्वसित इमारतींनाही गेल्या आठवड्यात निवासी दाखला प्राप्त झाला. त्यामुळे आता या घरांसाठी सोडत काढण्याचा निर्णय मंडळाने घेतला. त्यानुसार १६ फेब्रुवारीला ही सोडत काढण्यात येईल, अशी माहिती मुंबई मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. एकूण ६७२ पैकी ६२९ मूळ भाडेकरूंनी मंडळाकडे कागदपत्रे सादर करून पात्रतानिश्चिती प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्यामुळे सोडतीत ६२९ घरांचाच समावेश करण्यात येणार आहे, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. सोडतीद्वारे मूळ भाडेकरूंना कुठे आणि कोणते घर वितरित करायचे, हे निश्चित केले जाणार आहे.

# शहरातील बेवारस वाहनांचे पुन्हा सर्वेक्षण, वाहने हटविण्यासाठी पालिकेचा पुढाकार

**वसई : सुचिता देशमुख**

मागील काही वर्षांपासून वसई विरार शहरात बेवारस वाहनांचा प्रश्न जटिल बनला आहे. या बेवारस वाहनांमुळे रहदारीला अडथळे ठरू लागली आहेत. अशा बेवारस वाहनांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी महापालिकेने सर्वेक्षण करून बेवारस वाहने हटविली जाणार आहेत. आतापर्यंत सर्वेक्षणात ३५ ते ४० बेवारस वाहने आढळून आली आहेत. वसई विरार शहरात वर्षानुवर्षे रस्त्यावर उभ्या असलेल्या बेवारस वाहने व भंगार साहित्य यामुळे शहराचे विद्रुपीकरण होऊ लागले आहे. त्यासोबत शहरातील वाहतुकीस अडथळा तयार होऊन वाहने चालविण्यास अडचणी निर्माण होत आहेत. शहरात आधीच रस्ते अरुंद व वाहनांची संख्या अधिक आहे. त्यातच बेवारस व भंगारात गेलेली वाहने रस्त्याच्या कडेला उभी करून रस्ते गिळंकृत होऊ लागले आहेत. वर्षानुवर्षे



वर्षे ही वाहने एका जागीच उभी राहत असल्याने समस्या निर्माण होत असतात. अशा वाहनांमुळे वाहतुकीला अडथला निर्माण होत असतो. याशिवाय रस्त्यावरून नागरिकांना ये जा करणेही अडचणीचे ठरते. तर दुसरीकडे या वाहनांचा गैरवापर होण्याचीशी शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी वाहने ही तशीच पडून असल्याने अशा वाहनांत आजूबाजूच्या भागातील लहान मुले ही खेळण्यास जात असतात त्यामुळेही एखादी दुर्घटना होण्याची शक्यता असते. शहरातील रस्त्यांची स्वच्छता करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ही वाहने व भंगार साहित्य रस्त्यावर पडून राहिल्याने योग्य रित्या स्वच्छता करता येत नाही. नागरिकांनी ही बेवारस वाहने हटविण्यात यावी अशी मागणी केली होती. या सर्व समस्या लक्षात घेऊन पालिकेने आता शहरातील बेवारस वाहने व रस्त्यावर ठेवून देण्यात आलेले भंगाराचे साहित्य हटविण्यावर लक्ष केंद्रित केले असून पुन्हा एकदा ही मोहीम तीव्र पणे राबवून शहरातील रस्त्यावर व रस्त्यालगत असलेली वाहने हटवून वाट मोकळी केली जाणार असल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले आहे. याबाबत महापालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार य यांनी सर्व प्रभाग समितीच्या संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानुसार भंगारात पडून असलेल्या बेवारस वाहनांवर सर्वेक्षण करून कारवाई केली जाणार असून यामुळे रस्ते मोकळे होणार आहेत.

वसई विरार महापालिकेने सर्वेक्षण सुरू केले आहे. आतापर्यंत करण्यात आलेल्या सर्वेक्षणात प्रभाग समिती सी मध्ये २० तर प्रभाग समिती आय मध्ये अशा प्रकारची भंगारात पडून असलेली १७ वाहने आढळून आली आहेत.

# महापालिकेचे एकात्मिक पदपथ धोरण तयार, पदपथ चालण्यायोग्य बनवण्यासाठी महापालिकेचा संकल्प

**मुंबई : गणेश बागडे**

मुंबईत दोन्ही उपनगरांसह शहरातील अनेक पदपथांची दुरावस्था झाली आहे, तर बहुतांश पदपथांवर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केले आहे. परिणामी, नागरिकांना चालण्यायोग्य पदपथ उपलब्ध नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे. मात्र, या समस्येकडे आता महापालिकेने गांभीर्याने पाहायला सुरुवात केली असून लवकरच पदपथांची एकूण स्थिती सुधारण्याचा महापालिकेचा मानस आहे. यासाठी महापालिकेने एकात्मिक पदपथ धोरण तयार केले आहे.

याअंतर्गत दिव्यांगांसाठीही अनुकूल पदपथ तयार करण्यावर भर देण्यात येणार आहे. मुंबईत



पदपथांवरील अतिक्रमणे, उखडलेल्या फरशा, अतिउंची यामुळे नागरिकांना पदपथांवरून चालणे गैरसोयीचे ठरू लागले आहे. पदपथ चालण्यायोग्य नसल्याने अनेकदा नागरिकांना थेट रस्त्यावरून जीव मुठीत घेऊन चालावे लागते. अनेकदा यामुळे अपघाताही घडतात. काही वेळा यात जीवितहानी देखील होते. मुंबईतील अनेक पदपथांवर अनधिकृतरित्या छोटी दुकाने, मंदिरे बांधण्यात आली आहेत. चालण्यायोग्य पदपथ उपलब्ध नसल्याने नागरिक रस्त्यांवरून प्रवास करतात. त्यामुळे वाहतूक कोंडीही होते. मात्र, आता मुंबई शहरातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होत असताना पदपथांकडेही लक्ष देण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे.

# औक घटकेसाठी एपीएमसी सभापती, उपसभापतींची निवडणूक, दोन आठवड्यात घेण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

**नवी मुंबई : धनश्री सट्टा**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व उपसभापती पदाची निवड दोन आठवड्यात घ्या असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या दोन सदस्यीय खंडपीठाने दिले आहेत. सन २०२२ मध्ये सभापती, उपसभापती यांनी आपत्र ठरल्याने राजीनामा दिला होता, त्यामुळे ही पदे गेल्या दोन वर्षांपासून रिक्त असून तोपर्यंत सभापती अशोक



डक काळजीवाहू सभापती म्हणून कार्यभार पाहत आहेत. ऑगस्टमध्ये या संचालक मंडळाचा कार्यकाळ संपुष्टात येत असून पुन्हा नव्याने निवडणुका होतील. त्यामुळे औक घटकेसाठी या सभापतींची निवडणूक होणार की शासन संचालक मंडळ बरखास्त करणार अशी चर्चा बाजारात सुरु आहे. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एकुण २७ संचालक असतात. सहा महसूल विभागांतील प्रत्येकी दोन शेतकरी प्रतिनिधी, वाशीतील कांदा बटाटा बाजार, भाजीपाला, फळ, धान्य आणि मसाला बाजारातून प्रत्येकी एक असे पाच संचालक तर माथाडी, हमाल, कामगारांमधून एक संचालक निवडला जातो. अशी १८ जणांची निवडणूक होते. राज्यातील ३०६ बाजार समित्यांची शिखर संस्था असलेल्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक फेब्रुवारी २०२० मध्ये बाजार समितीची निवडणूक घेण्यात आली होती. तर २ मार्च २०२० रोजी निकाल लागला होता. याआधी एपीएमसी बाजार समितीवर २०१३ ते २०२० असे सलग सात वर्ष प्रशासक राजवट होती. मात्र निकाल लागताच देशात करोना संक्रमण आले आणि टाळेबंदी जाहीर झाली. त्यामुळे संचालक मंडळाच्या बैठकी अभावी सभापतींची नियुक्ती लांबवणीर गेली. ३१ ऑगस्ट २०२० संचालक मंडळाच्या बैठकीत बीडचे शेतकरी प्रतिनिधी अशोक डक यांची सभापतीपदी निवड करण्यात आली. त्यामुळे निकाल मार्च २०२० मध्ये लागला तरी संचालक मंडळांचा कार्यकाळ हा ऑगस्ट २०२० पासून ग्राह्य धरण्यात आलेला आहे. मात्र आता उच्च न्यायालयाने येत्या काही आठवड्यांमध्ये सभापती, उपसभापतीची निवडणूक घेण्या आदेश दिले आहेत.

# शिळफाटा रस्त्यावरील निळजे रेल्वे पुलाला काँक्रिटच्या १९ चौकटी बसविण्याचे काम पूर्ण

**डोंबिवली : सतिश सोनावणे**

शिळफाटा रस्त्यावरील निळजे रेल्वे उड्डाण पुलाच्या पुनर्बांधणीसाठी लागणाऱ्या सीमेंट कॉंक्रीटच्या १९ भक्कम चौकटी बसविण्याचे आव्हानात्मक काम समर्पित जलदगती रेल्वे मालवाहू विभागाच्या अभियंता, कामगारांनी शनिवारी रात्री पूर्ण केले. हे काम विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी शक्तिमान यांत्रिक यंत्रणा पुलाच्या परिसरात कुशल मनुष्यबळासह तैनात आहे. हे काम सोमवारी रात्री १२ वाजेच्या आत पूर्ण करण्याचे रेल्वेच्या अभियंत्यांचे लक्ष्य आहे. सीमेंट कॉंक्रीटच्या अवजड चौकटी उचलण्यासाठी ७०० टनाची क्रेन, क्रेनवरील चौकटी खेचण्यासाठी खेचकाम (पुलर) यंत्र याठिकाणी तैनात आहेत. निळजे रेल्वे पुलाचे काम सुरू करण्यापूर्वीच याठिकाणी काही दिवसापूर्वीच पुलाच्या चारही बाजु बंदिस्त करणाऱ्या कॉंक्रीटच्या भक्कम चौकटी निळजे रेल्वे उड्डाण पुलाच्या बाजुला आणून ठेवण्यात आल्या होत्या.

बुधवारी रात्रीपासून निळजे रेल्वे उड्डाण पुलाच्या कामाला प्रारंभ करण्यात आला. हे काम पाच दिवसाच्या अवधीत कसे पूर्ण होणार याविषयी नागरिकांमध्ये उत्सुकता होती. पाच दिवस शिळफाटा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्याचा निर्णय वाहतूक विभागाकडून झाल्यानंतर पोकलेन, कापकाम यंत्रांच्या साहाय्याने रेल्वे पुलाच्या मार्गातील दगड, मातीचा थस दोन दिवसात कापून काढण्यात आला. पुलाचे काम सुरू असताना



या कामात शिळफाटा रस्त्यावरील वाहतुकीचा कोणताही अडथळा येऊ नये म्हणून वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट, कोळसेवाडी वाहतूक विभागाचे सचिन सांडभोर, मुंब्रा, डोंबिवली वाहतूक विभागाचे कर्मचारी एकूण १५० शिळफाटा मुख्य रस्ता आणि पर्यायी आठ रस्त्यांवर २४ तास वाहतूक नियोजनाचे काम करत होते. या रस्ते कामामुळे शिळफाटा रस्ता पाच दिवस अभूतपूर्व वाहतूक कोंडीत अडकेल अशी भीती प्रवाशांच्या मनात निर्माण झाली होती. परंतु, कोळसेवाडी वाहतूक विभागाचे सचिन सांडभोर यांनी या रस्त्यावर हलक्या वाहनांव्यतिरिक्त अवजड एकही वाहन येणार नाही. बहुतांशी हलकी वाहने शिळफाटा पलावा चौकाकडे न येता पर्यायी रस्ते मार्गाने जातील यादृष्टीने वाहतुकीचे नियोजन केले होते.

# पोलिस ठाण्यात महिला तक्रार निवारण केंद्र सुरू करा, राज्य बालहक्क संरक्षक आयोगाचे बदलापूर पोलिसांना आवाहन

**ठाणे : तृप्ती गोरे**

बदलापूर येथील एका खासगी शाळेत झालेल्या विद्यार्थिनीचा विनयभंग प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या निलीमा चौधरी यांनी शुक्रवारी संबंधीत शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी पोलिसांशी संवाद साधून या प्रकरणातील सर्व दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना केल्या. तर अंबरनाथ, उल्हासनगर आणि बदलापूर येथे महिला तक्रार निवारण केंद्रच नसल्याचे समोर आले असता पोलिसांनी आता पुढाकार घेऊन पोलीस ठाण्याच्या आवारातच जलदगतीने महिला तक्रार निवारण केंद्र सुरु करण्यात यावे. यासाठी तीनही शहरातील पोलिसांनी प्रस्ताव सादर करावे अशा सूचना त्यांनी यावेळी स्थानिक पोलीस प्रशासनाला



दिल्या आहेत. बदलापूर येथील एका खासगी शाळेत १४ वर्षाच्या विद्यार्थिनीचा शाळेतील शिक्षकानेच विनयभंग केल्याची घटना गुरुवारी उघडकीस आली. यातील आरोपी शिक्षकाच्या विरोधात पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून त्याला बदलापूर पश्चिम पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन शुक्रवारी राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या निलीमा चौधरी यांनी शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी पोलीस प्रशासन, शिक्षण विभागाचे अधिकारी, जिल्हा बालसंरक्षण अधिकारी यांची एकत्रितरित्या बैठक घेऊन प्रकरणाची सविस्तर चौकशी केली. यावेळी संबंधित शाळेला केवळ इयत्ता पहिली पर्यंतच परवानगी असून पुढील सर्व इयत्तांचे वर्ग अनाधिकृत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला.

# म्हणून मला मोदी अन् योगी आवडतात... ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे वक्तव्य

**ठाणे : संजय बोडके**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाषण सभ्य असते. विरोधी पक्षाने आरोप केल्यास ते कधीही त्यांना वाईट बोलत नाहीत. तर योगी आदित्यनाथ यांच्यामध्ये मला माझी प्रतिमा दिसते. त्यांच्याकडे हिमंत आहे. त्यामुळे मला राजकारणामध्ये योगी आणि मोदी आवडतात असे मत ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी व्यक्त केले.

स्वातंत्र्यवीर सेवा प्रतिष्ठानच्या वतीने शनिवारी आनंदोत्सव संगीत समारोहाचे आयोजन डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांची विशेष मुलाखत घेण्यात आली. यावेळी मंत्री प्रताप सरनाईक, उदय सामंत, शंभूराज देसाई, भरत



गोगावले, प्रकाश आबिटकर, दिग्दर्शक आणि अभिनेते प्रवीण तरडे उपस्थित होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्ताने 'एकनाथ तृष्ठलोकनाथ तू' या गाण्याचे अनावरण आशा भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर अभिनेते अभिजीत खांडकेकर यांनी आशा भोसले यांची मुलाखत घेतली. ही मुलाखत ऐकण्यासाठी ठाणेकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आशा भोसले म्हणाल्या की, मोदी हे पहाटे उठतात. योगा करतात आणि कामाला लागतात. विरोधी पक्षाने आरोप केल्यास त्यांनी कधीही कोणाला वाईट म्हटले नाही. त्यांचे भाषण अगदी सभ्यपणे असते. योगीराज यांच्यामध्ये मला माझी प्रतिमा दिसते. बाळासाहेब ठाकरे हे देखील माझे आवडते राजकारणी होते.


महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय

मध्य मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सायली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ः-४०० ०१८.

दुरध्वनी क्र.०२२-२४९२४३४९, ई-मेल ःelcentralmumbai.ee@mahapwd.com

**ई निविदा सुचना क्र.३५सन २०२४-२५ ( दुसऱ्या वेळेस)**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग वरळी मुंबई, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून विद्युत अनुज्ञप्तीधारक कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता बी १ टक्केवारी नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता मध्य मुंबई विद्युत विभाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम |
|---|---|---|
| 1 | Est. No H11080 / 23-24 Providing & installation of powereasy Smart Optimizer at various departments at Grant Medical College, Sir JJ Group of Hospital, Byculla, Mumbai | 86482209 |

१ करावा - अंदाजीत रक्कमेवर नमुद केलेल्या दरानुसार आलेल्या रक्कमेवर जी.एस.टी. १८ टक्के पर्यंत वेगळा अदा करण्यात येईल.

२ ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि.१०.०२.२०२५ ते दि. २४.०२.२०२५ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत.

३ निविदा पुर्व बैठकः दि.१७.०२.२०२५ रोजी दुपारी ३ वाजता मुख्य अभियंता यांचे कार्यालय सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई ४था मजला, बांधकाम भवन २५, मर्झबान पथ फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे घेण्यात येईल.

४ ई निविदा उघडणे ः दि.२७.०२.२०२५ रोजी सकाळी ११.०० नंतर सोईस्कर वेळेनुसार अधीक्षक अभियंता, मुंबई प्रादेशिक विद्युत मंडळ,

५ खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्धआहे.

१. http://mahatenders.gov.in

(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती व सूचना फलकावर कळविण्यात येईल.)

जा.क्र.काअ/ममुंविवि/निविदा/ ४६२ /२०२५

दिनांक ः 04/02/2025

Sd/-

कार्यकारी अभियंता
मध्य मुंबई विद्युत विभाग
सा.बां.विभाग वरळी

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/६२३१



**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक बांधकाम विभाग

निविदा सूचना

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां. विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. ब-१ को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक ६.२.२०२५ ते १३.२.२०२५ पर्यंत देण्यात येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक १४.२.२०२५ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | यलोगेट पोलीस स्टेशन मुंबई येथील ३ मजल्यावरील प्लास्टर रंगकाम, दरवाजा, खिडक्या, फ्लोरींग दुरूस्ती करणे. | ८,४३,६३१/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| २ | जुने जकात घर मुंबई भगतसिंग रोड सेतु कार्यालय येथील अंतर्गत प्लास्टर, दरवाजा, खिडक्या, फ्लोरींग रंगकाम, दुरूस्ती करणे. | ८,४१,८८७/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ३ | जे. जे. स्कुल ऑफ आर्ट आवारातील दक्षिण व उत्तर बाजूस नविन व जुने अप्लाईड आर्ट इमारत येथे दुरूस्ती करणे. (भाग - १४, १५, १६) | ७,२१,२९९/- | ७,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ४ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील २ मजल्यावरील विविध रूम येथे दुरूस्ती करणे. | ८,३८,२३३/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ५ | यलोगेट पोलीस स्टेशन मुंबई येथील १ मजल्यावरील प्लास्टर रंगकाम, दरवाजा, खिडक्या, फ्लोरींग दुरूस्ती करणे. | ८,४२,८२५/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ६ | जुने जकात घर मुंबई येथील ड्रेनेज लाईन रंगकाम, दुरूस्ती करणे. | ३,६०,०१५/- | ३,७००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ७ | जे.जे. स्कुल ऑफ आर्ट आवारतील दक्षिण व उत्तर बाजूस नविन व जुने अप्लाईड आर्ट इमारत येथे दुरूस्ती करणे.(भाग-१७,१८,१९) | ६,७०,४३४/- | ६,८००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ८ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील ३ मजल्यावरील विविध रूम येथे दुरूस्ती करणे. | ८,३६,४४१/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ९ | बाजार गेट पोलीस स्टेशन मुंबई येथील मुख्य इमारत येथील येथे क्रॅक फिलींग, सॅनीटरी, वॉटर सप्लाय फिटींग, ड्रेनेज लाईन साफसफाई इ. दुरूस्तीची कामे करणे. | ८,३१,८६०/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १० | प्रशासकिय महाविद्यालय इमारत मुंबई येथील मानवी हक्क कमिशनर कार्यालय आवार येथे अंतर्गत प्लास्टर रंगकाम, दरवाजा, खिडक्या, फ्लोरींग, कडाप्पा स्टोरेज डाव्या बाजूस कॅबिन दुरूस्ती करणे. | ८,४१,५५१/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ११ | यलोगेट पोलीस स्टेशन मुंबई येथील जुने जकात घर आवार व क्विक रिस्पॉनस फोर्स कार्यालय इमारत येथे दुरूस्ती व वार्षिक देखभाल करणे. | ७,७४,००९/- | ७,८००/- | १२ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १२ | बॉम्बे हॉस्पीटल मुंबई येथील सिव्हील डिफेंस ट्रेनींग सेंटर व कार्यालय येथे क्रॅक फिलींग, सॅनीटरी, वॉटर सप्लाय फिटींग, ड्रेनेज लाईन साफसफाई इ. दुरूस्तीची कामे करणे. | ५,६४,१५४/- | ५,७००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावार सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा.क्र. इशवि/निलि/११७५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
इलाखा शहर विभाग, २ रा माळा,
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक :- ३.२.२०२५

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/६१५१

(व्ही. प. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

प्रत :- उप अभियंता, दक्षिण, पश्चिम, मध्य उप विभाग आणि अधीक्षक आमदार निवास मुंबई यांना माहितीसाठी रवाना.
प्रत :- सुचनाफलक

# ठाण्यात अंमली पदार्थ तस्करी करणाऱ्यांवर कारवाई; १९ जणांना अटक

**ठाणे : विशेष प्रतिनिधी**

कल्याण, डोंबिवली शहरात मागील तीन महिन्यापासून पोलिसांचे नशा मुक्त अभियान सुरू आहे. या विशेष अभियानातून अंमली पदार्थ विरोधी पथकाने गेल्या चाळीस दिवसांच्या कालावधीत कल्याण, डोंबिवली शहराच्या विविध भागातून एकूण १२ लाखाहून अधिक किमतीचे अंमली पदार्थ जप्त केले आहेत. याप्रकरणात पोलिसांनी १९ जणांना अटक केली आहे. जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थांमध्ये ६३ ग्रॅम मेफोड्रिन, नशा आणणाऱ्या २३२ कोडिनयुक्त बाटल्या, ४८ किलो गांजाचा समावेश आहे. याप्रकरणात मानपाडा पोलीस ठाणे हद्दीत डोंबिवलीत नांदिवली टेकडी भागातून सनिल श्रीसमर्थ यादव (२५) यांच्याकडून ८.४८ ग्रॅम वजनाचा १६ हजार रूपये किमतीचा गांजा जप्त करण्यात आला आहे. अंमली पदार्थ तस्करी विरोधी कायद्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डोंबिवली पूर्वेतील राजाजी पथ येथील स्वामी नारायण मंदिराच्या बाजुला असलेल्या मोकळ्या जागेतून रामनगर पोलीस ठाणे हद्दीत पोलिसांनी सचिन एकनाथ कावळे (३२, रा. वसंत केणे चाळ, दत्तनगर, डोंबिवली), दत्तनगर मधील एक १६ वर्षाचा अल्पवयीन मुलगा यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून २६ ग्रॅम मेफोड्रिन पावडर, १० ग्रॅम चरस जप्त करण्यात आली. या पदार्थांची बाजारातील किंमत ९३ हजार रूपये आहे. त्यांच्यावर रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याणमधील बाजारपेठ पोलीस ठाणे हद्दीत दुर्गाडी किल्ला भागातील भटाळे तलाव भागातून अंमली पदार्थ विरोध पथकाने शंकर महादेव



गिरी (४६) यांना ताब्यात घेतले आहे. ते मुळचे बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील टाकळी गावचे रहिवासी आहेत. ते मजुरीसाठी कल्याणमध्ये आले होते. त्यांच्या ताब्यातून एक लाख रूपये किमतीचा नऊ किलो गांजा पोलिसांनी जप्त केला आहे. बाजारपेठ पोलीस ठाण्यात त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणे ते कर्जत दरम्यान गांजा तत्सम अंमली पदार्थांची तस्करी करणारा एक मोठा भाई डोंबिवलीत राहतो. तो किरकोळ विक्रीतून अंमली पदार्थ विकत असतो अशी चर्चा आहे. त्यामुळे डोंबिवली, कल्याण परिसरात मागील अनेक वर्ष गांजाची तस्करी वाढली. पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी पदभार स्वीकारल्यापासून ही तस्करी, त्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्याची मोहीम सुरू केली आहे. 'अंमली पदार्थ तस्करी प्रकरणी विविध पोलीस ठाण्यात एकूण १३ गुन्हे दाखल आहेत. याप्रकरणात १९ जणांना अटक करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थांची किंमत १२ लाखाहून अधिक आहे. नशामुक्त शहरे हे शीर्षक घेऊन अंमली पदार्थ तस्कर, अड्ड्यांवर तत्परतेने कारवाई केली जात आहे. अशा प्रकरणात नागरिकांनी माहिती दिली तरी त्यांचे नाव गुप्त ठेऊन संबंधित अड्ड्यांवर कारवाई केली जात आहे.- अतुल झेंडे, पोलीस उपायुक्त, कल्याण परिमंडल

# दोन पिस्तुलासह सराईत आरोपीच्या मेघवाडी पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. दररोज राज्यातील वेगवेगळया जिल्ह्यातून खून, हाणामारी, गाड्यांची तोडफोड तसेचं चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. यामुळे नागरिकांसोबतचं पोलीसही हैराण झाले आहेत. अशातचं आता एक मोठी बातमी समोर आली आहे. मेघवाडी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. दोन पिस्तुल, जिवत काडतुसे आणि दहा लाख रुपये रोख रकमेसह सराईत आरोपीला मेघवाडी पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी शस्त्राची विक्री करण्यासाठी आला होता. त्यावेळी त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गौस मोहिद्दीन शहाबुद्दीन सय्यद




असे आरोपीचे नाव आहे.सहाय्यक पोलीस निरीक्षक सम्राट वाघ व पोलीस शिपाई दत्तात्रेय बागुल यांना सराईत आरोपी जोगेश्वरी पूर्व येथे शस्त्रांची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे जोगेश्वरी पूर्व येथील पश्चिम द्रुतगती मार्गाजवळील रामगड परिसरात पोलिसांना सापळा रचला होता होता. आरोपी गौस मोहिद्दीन शहाबुद्दीन सय्यद येथील पाण्याच्या टाकीजवळ येऊन उभा राहिला होता. त्याची ओळख पटल्यानंतर पोलिसांनी त्याला घेराव घातला. आरोपी पळण्याचा प्रयत्न करू लागला. त्यावेळी त्याला ताब्यात घेण्यात आले. आरोपीची झडती घेतली असता त्याच्या जवळ १० लाख रुपये रोख रक्कम, देशी बनावटीच्या दोन पिस्तुल, सहा जिवंत काडतुसे असा एकूण ११ लाख रुपयांचा मुद्देमाल सापडला. आरोपीविरोधात भारतीय शस्त्रास्त्र कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. आरोपी सराईत गुन्हेगार असून, यापूर्वीही मेघवाडी पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीकडून देशी बनावटीच्या दोन पिस्तुल हस्तगत करण्यात आल्या असून, त्याची विक्री करण्यासाठी आरोपी जोगेश्वरी येथे आला होता. यापूर्वीही आरोपीने अशाच प्रकारे शस्त्रांची विक्री केल्याचा संशय आहे. त्या शस्त्रांच्या विक्रीचे १० लाख रुपये आरोपीकडे मिळाल्याचा संशय आहे. त्यामुळे आरोपीने यापूर्वी कोणाला शस्त्रांची विक्री केली, याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# अज्ञात चोरटे व माथेफीरूंची अजब चोरी; पैशांबरोबरच आता शेतमालावर डल्ला

**पुणे : विशेष प्रतिनिधी**

आजपर्यंत आपण अनेकदा सोने चांदीचे दागिने व पैशांची चोरी, दरोडे किंवा मंदिरातील दानपेट्या फोडून त्यातील पैसे व इतर ऐवज चोरल्याच्या घटना मोठ्या प्रमाणात ऐकल्या आहेत. मात्र शेतकऱ्यांच्या शेतमालावर डल्ला मारून त्याचे नुकसान करण्याचा प्रकारही आता घडू लागला आहे. नारायणगाव येथील शशिकांत वसंत कोल्हे यांच्या तोडणीस आलेल्या जम्बो वाणाच्या द्राक्षांची चोरी करून ती द्राक्ष खाऊन झाल्यानंतर ग्रामपंचायत नारायणगाव यांनी केलेल्या बंधाऱ्यात फेकून देण्याचा प्रकार उघडकीस आला आहे . याबाबत ग्रामपंचायत सदस्य हेमंत कोल्हे यांनी सांगितले की,



नारायणगाव ग्रामपंचायतच्या वतीने नुकतेच कोल्हेमाळा येथे छोटे छोटे बंधारे करण्यात आले आहेत. या बंधाऱ्याच्या जवळच असलेल्या शशिकांत कोल्हे यांच्या द्राक्ष बागेतून अज्ञात चोरट्यांनी गुरुवारी दिनांक ६ रोजी मध्य रात्री द्राक्षांची चोरी करून काही द्राक्षे बंधाऱ्यात फेकून दिली. येथील शेतकरी सुनील कोल्हे सकाळी शेतावर काम करण्यासाठी गेले असता त्यांच्या ही बाब निदर्शनास आली. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता आपल्या शेतावर शेतमालाची राखण करण्याची गरज भासू लागली आहे. दरम्यान या भागात मोठ्या प्रमाणावर बिबट्याचे अस्तित्व असताना आपल्या शेतमालाला पहारा कसा द्यावा असाही प्रश्न शेतकऱ्यांपुढे निर्माण झाला आहे.

## बेवारस मृतदेह

वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्रमांक १११/२०२४, कलम- १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ अन्वये अनोळखी बेवारस मयत इसम नामे श्यामराव, वय अंदाजे- ५६ वर्षे, उंची- ५ फूट, बांधा- सडपातळ, वर्ण- सावळा, असलेला इसम वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये मिळून आला असून उपचाराकामी भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी उपचारादरम्यान मयत घोषीत केले. नमूद इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यास खालील नंबरवर संपर्क करावा.



**संपर्क-**
**श्री.अजिनाथ फुंदे, पोलीस उपनिरीक्षक**
**वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ९६८९८५८०४८**
**पोलीस ठाणे क्रमांक : ०२२२६४२३१२२**

## बेवारस मृतदेह

अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्रमांक ०४/२०२५, कलम- १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ अन्वये अनोळखी बेवारस इसम, वय अंदाजे- ४२ वर्षे, बांधा- मध्यम, रंग- सावळा, उंची ५ फूट ६ इंच, असलेला इसम अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये मिळून आला असून उपचाराकामी कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी दाखलपूर्व मयत घोषित केले. नमूद इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यास खालील नंबरवर संपर्क करावा.



**संपर्क-**
**श्री.सुहास पाटील, पोलीस उपनिरीक्षक**
**अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ८८३०१५१०६०**
**पोलीस ठाणे क्रमांक : ०२२२६८३१५६३**

# एनसीबीच्या कारवाईत २०० कोटींच्या अमली पदार्थांसह चौघांना अटक

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

अमली पदार्थ नियंत्रण विभागाने एनसीबी केलेल्या कारवाईत सुमारे ११ किलो कोकेन, ४.९ किलो गांजा, कॅनॅबिस गमीजची २०० पाकिटे जप्त केली. या कारवाईत चौघांना अटक करण्यात आली असून ही टोळी संपूर्ण देशभरात अमली पदार्थांचे वितरण करीत होती. विशेष करून या टोळीचे मुंबईत मोठे जाळे पसरले होते, अशी माहिती सूत्रांनी दिली. एनसीबीने जानेवारी २०२५ मध्ये २०० ग्रॅम कोकेन जप्त केले होते. या प्रकरणात मिळालेल्या माहितीच्या आधारे एनसीबीने नुकतीच नवी मुंबई येथे कारवाई करून ११ किलो



५४० ग्रॅम उच्च दर्जाचे कोकेन, ४ किलो ९०० ग्रॅम गांजा, २०० पाकिटे ५.५ किलोग्रॅम कॅनॅबिस गमीज आणि एक लाख ६० हजार रुपये रोख रक्कम जप्त केली. मुंबईतील आंतरराष्ट्रीय कुरिअर कंपनीमधून ऑस्ट्रेलियाला पाठविण्यात येणाऱ्या एका पार्सलमधून अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. एनसीबीच्या मुंबई कक्षाला तपासादरम्यान याप्रकरणात मोठी टोळी कार्यरत असल्याची माहिती मिळाली. ही टोळी भारतातून परदेशात मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांची तस्करी करीत असल्याचे एनसीबीला समजले. त्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. जप्त केलेले अमली पदार्थ आरोपींनी अमेरिकेतून मुंबईला आणले होते. नंतर ते कुरिअर / लहान मालवाहतूक सेवांद्वारे, तसेच मानवी वाहकांच्या ह्यूमन कॅरिअर्स मदतीने भारत आणि परदेशातील विविध ग्राहकांना पाठवले जाणार होते. आरोपींना एकमेकांची माहिती नव्हती. खोटी नावे वापरून या टोळीतील सदस्य अमली पदार्थांची देवाण घेवाण करीत होते. याप्रकरणी आतापर्यंत चौघांना अटक करण्यात आली असून, टोळीत सहभागी अन्य तस्करांची माहिती एनसीबीला मिळाली आहे. या माहितीच्या आधारे तपास करण्यात येत आहे.

## महाराष्ट्र शासन

इलाखा शहर विभाग, (सा.बां.)

**ई -निविदा सुचना क्र. ७६ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. लक्ष |
|---|---|---|
| १ | एन. डी. रोड मलबार हिल मुंबई येथील शासकीय बंगला देवगिरी येथे प्लास्टर, रंगकाम, अॅल्युमिनिअम सेक्शन, फर्निचर दुरूस्ती करणे. | १२.६५ |
| २ | उच्च न्यायालय मुंबई येथील कनेक्टींग पॅसेज इमारत येथे प्लास्टर,खिडक्या शटर दुरूस्ती करणे. | १६.३४ |
| ३ | जुने जकात घर मुंबई येथील २ मजल्यावरील डिव्हाय. कलेक्टर कॅबिन व १ मजल्यावरील नॅचरल डिजास्टर कंट्रोल रूम येथे दुरूस्ती करणे. | १५.६० |
| ४ | चर्चगेट मुंबई येथील यशोधन इमारत फ्लॅट नं. १४ येथे नुतनीकरण व दुरूस्ती करणे. | १४.४९ |
| ५ | जुने जकात घर मुंबई येथील तळमजल्यावरील इलेक्शन गोडाऊन येथे प्लास्टर, लाकडी प्लॅक सिलींग, जी.आय शीट, दरवाजे, खिडक्या, रंगकाम, नुतनीकरण व दुरूस्ती करणे. | ११.३६ |
| ६ | मुंबई येथील मुख्य इमारत ७ मजल्यावरील मा. सीएम अॅडवाईजर कॅबीन ७०२ येथे नुतनीकरण करणे. | १८.६४ |
| ७ | एन. डी. रोड मुंबई मलबार हिल येथील चिफ जस्टीस हाऊस, सेवकनिवासस्थान येथे ऑफिस, हॉल, गेस्ट हाऊस, डाईनिंग हॉल, बेडरूम येथे प्लास्टर, रंगकाम, दुरूस्ती करणे. | १९.१७ |
| ८ | स्टेट इंस्टीस्ट्यूट ऑफ अॅडमिनिस्ट्रेटीव करीअर मुंबई येथील मोटार अपघात कोर्ट आवार येथे जी.आय.शीट रूफची दुरूस्ती करणे. | १५.५० |
| ९ | एन. डी. रोड मुंबई येथील शिवगीरी, मेघदुत, सागर येथे सॅनीटरी, प्लंबर फिटींग, हार्डवेअर मटेरीअल, लेबर सप्लाय येथे वार्षिक दुरूस्तीची कामे करणे. | ११.५४ |
| १० | महापालिका मार्ग मुंबई येथील चिफ मॅट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट कोर्ट आवार येथे ड्रेनेज लाईनची नुतनीकरण करणे. | २२.११ |
| ११ | मंत्रालय विस्तार इमारत मुंबई येथील पीडब्ल्युडी ऑफिस (फेज-४) २ मजल्यावरील रूम नं. २५२ येथे नुतनीकरण करणे. | ३५.८१ |
| १२ | जुने जकात घर मुंबई येथील १ मजल्यावरील कर्मचारी कार्यालय व अतिरीक्त जिल्हाधीकारी कार्यालय येथे अपग्रेडेशन इ नुतनीकरण दुरूस्ती करणे. | ३४.२७ |
| १३ | सिटी सिव्हील कोर्ट मुंबई येथील जुने सचिवालय मुख्य इमारतीमधील कोर्ट क्र. ३५,५,५९ मध्ये अंतर्गत रंगकाम व पॉलिश करणे. | १८.२२ |
| १४ | उच्च न्यायालय मुंबई मुख्य इमारत कोर्ट डिपार्टमेंट येथे कोर्ट रूम नं. ३७, ५५, ७२ खिडक्या, पार्टीशन, फर्निचर रंगकाम व दुरूस्ती करणे. | १६.७४ |
| १५ | एन. डी. रोड मुंबई येथील अवंती इमारत येथे सॅनीटरी, प्लंबर फिटींग, हार्डवेअर मटेरीअल, लेबर सप्लाय येथे वार्षिक दुरूस्तीची कामे करणे. | १४.८३ |
| १६ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील १ व २ मजल्यावरील विविध रूमची दुरूस्ती करणे. | ४०.०९ |
| १७ | जुने जकात घर मुंबई येथील डी. डी. इमारत तळमजला ते ४ मजल्यावरील पॅसेज, पॉलीमर मोर्टर, प्लास्टर, फ्लोरींग, रंगकाम, नुतनीकरण व दुरूस्ती करणे. | २२.७४ |
| १८ | उच्च न्यायालय मुंबई पीडब्ल्युडी मुख्य इमारत १ मजल्यावरील सुप्रिटेंडिंग कार्यालय, सरकारी वकील कार्यालय येथे फ्लोरींग, टेबल, सोफा इ. काम करणे. | १९.०८ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. ११.२.२०२५ ते दि. २५.२.२०२५ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. २६.२.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्र. इशवि/निलि/९३२७
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : ११/२/२०२५

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/६२८४

## बेवारस मृतदेह

वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्रमांक १०६/२०२४, कलम- १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ अन्वये अनोळखी बेवारस मयत इसम वय अंदाजे- ५० वर्षे, बांधा- सडपातळ, असलेला इसम वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये मिळून आला असून नमूद इसमाचे नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे. तरी कोणी ओळखत असल्यास खालील नंबरवर संपर्क करावा.



**संपर्क-**
**श्री.अजिनाथ फुंदे, पोलीस उपनिरीक्षक**
**वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ९६८९८५८०४८**
**पोलीस ठाणे क्रमांक : ०२२२६४२३१२२**

## बेवारस मृतदेह

वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्रमांक ११२/२०२४, कलम- १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ अन्वये अनोळखी बेवारस मयत इसम वय अंदाजे- ५५ वर्षे, बांधा- सडपातळ, असलेला इसम वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये मिळून आला असून नमूद इसमाचे नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे. तरी कोणी ओळखत असल्यास खालील नंबरवर संपर्क करावा.



**संपर्क-**
**श्री.अजिनाथ फुंदे, पोलीस उपनिरीक्षक**
**वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ९६८९८५८०४८**
**पोलीस ठाणे क्रमांक : ०२२२६४२३१२२**

## महाराष्ट्र शासन

इलाखा शहर विभाग, (सा.बां.)

**ई -निविदा सुचना क्र. ७३ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. लक्ष |
|---|---|---|
| १ | महापालिका मार्ग मुंबई येथील आझाद मैदान पोलीस स्टेशन येथे ४ हेड कॉन्स्टेबल आणि कॉन्स्टेबल क्वार्टर्स येथे मंगलोरी छताची दुरूस्ती करणे. | २३.११ |
| २ | प्रशासकिय महाविद्यालय मुंबई येथील मानवी हक्क कमिशनर, अपघात कोर्ट येथे कॅबीन, कोर्ट रूम, चेंबर, कॅबीन दुरूस्ती करणे. | १९.७८ |
| ३ | मलबार हिल मुंबई सह्याद्री स्टेट गेस्ट हाऊस ४ मजल्यावरील व्हीआयपी व व्हीव्हीआयपी सुट अंतर्गत पॉलिश, प्लास्टर, रंगकाम, दुरूस्ती करणे. | १९.९९ |
| ४ | एन. डी. रोड मुंबई येथील अंबर इमारत येथे सॅनीटरी, प्लंबर फिटींग, हार्डवेअर मटेरीअल, लेबर सप्लाय येथे वार्षिक दुरूस्तीची कामे करणे. | १४.८५ |
| ५ | बेलहेवन मुंबई येथील स्टाफ क्वार्टर्स येथे वार्षिक दुरूस्तीची कामे करणे. | ९.८३ |
| ६ | जोरावर भवन मुंबई येथील वार्षिक दुरूस्तीची कामे करणे. | ९.१४ |
| ७ | सिटी सिव्हील कोर्ट मुंबई येथील जुने सचिवालय मुख्य इमारतीमधील बाहेरील रंगकाम व प्लास्टर करणे. | १४.५८ |
| ८ | उच्च न्यायालय मुंबई पीडब्ल्युडी मुख्य इमारत १ मजल्यावरील सरकारी वकील कार्यालय येथे फ्लोरींग, डॅडो टाईल्स, बाथ नुतनीकरण करणे. | १९.१७ |
| ९ | मलबार हिल मुंबई सह्याद्री स्टेट गेस्ट हाऊस ३ मजल्यावरील व्हीआयपी व व्हीव्हीआयपी सुट अंतर्गत पॉलिश, प्लास्टर, रंगकाम, दुरूस्ती करणे. | १९.९९ |
| १० | टाऊन हॉल मुंबई, प्रशासकिय महाविद्यालय, शहिद भगत सिंग रोड, पोस्ट ऑफिस येथील आवार येथे क्रॅक फिलिंग, सॅनिटरी, वॉटर सप्लाय फिटींग,ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे. | १४.०५ |
| ११ | उच्च न्यायालय मुंबई येथील लिफ्ट ४ व ५ येथील हेड रूम दरवाजे, खिडक्या प्लास्टर, रंगकाम व दुरूस्ती करणे. | १६.८४ |
| १२ | एन. डी. रोड मुंबई येथील देवगीरी, रामटेक, सेवासदन, अजंता येथे सॅनीटरी, प्लंबर फिटींग, हार्डवेअर मटेरीअल, लेबर सप्लाय येथे वार्षिक दुरूस्तीची कामे करणे. | १४.८४ |
| १३ | सिटी सिव्हील कोर्टच्या नविन इमारतीमधील कॉलम, बीम, सीलींग, मायक्रो क्रॉक्रीट, पॉलीमर, पूर्व बाजू, पश्चिम बाजू आणि दक्षिण बाजू, उत्तर बाजूचे प्लास्टरए कंपाऊंड वॉल, पॅरापेट वॉल, हेडर रूमची बाह्य संरचनात्मक दुरूस्ती करणे. | ४५.३७ |
| १४ | महापालिका मार्ग मुंबई येथील चिफ मॅट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट कोर्ट आवार येथे कंपाऊंड वॉल चे नुतनीकरण करणे. | २८.४७ |
| १५ | लोकमान्य टिळक मार्ग मुंबई येथील सी पी ऑफिस आवार येथील ए ब्लॉक, कॉन्स्टेबल क्वॉर्टर्स, उजव्या व डाव्या बाजूस जिना दुरूस्ती करणे. | २०.३३ |
| १६ | एन. डी. रोड मलबार हिल मुंबई येथील शासकीय बंगला देवगिरी येथे प्लास्टर, दरवाजे, खिडक्या, सिलिंग, ग्रील, रिलिंग, मंगलोरी छत, पाईपलाईन, सॅनिटरी इ. दुरुस्तीची कामे करणे. | १२.६४ |
| १७ | उच्च न्यायालय मुंबई येथील आवार स्टोन वॉल येथे रॅम्प, हॅन्ड रेलिंग, फ्लोरींग, नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | १६.४४ |
| १८ | महापालिका मार्ग मुंबई येथील आझाद मैदान पोलीस स्टेशन येथे ४ युरोपीयन क्वार्टर्स येथे पेवर ब्लॉकची दुरूस्ती करणे. | २१.८४ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. ६.२.२०२५ ते दि. २०.२.२०२५ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. २१.२.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/९९६५
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : ३/२/२०२५

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/६१५३

# हम जहाँ खडे होते है, लाईन वहाँ से शुरू हो जाती है...; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नवी मुंबईत वक्तव्य

■ ठाणे : तृप्ती गोरे

मी वाहनात, कार्यालय, घर, कार्यक्रमात येताना कुठेही असू लोकांची निवेदने घेत असतो. हम जहाँ खडे होते है, लाईन वहाँ से शुरू हो जाती... मी जिथे उभा राहतो, तिथून जनसेवा सुरू होते. तसेच मी कधीही दरबारी राजकारण केले नाही असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नवी मुंबईत म्हणाले. काही दिवसांपूर्वीच ठाण्यात जनता दरबार भरविण्याचे विधान वन मंत्री गणेश नाईक यांनी केले होते. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या विधानाने आता नवी मुंबईत राजकीय चर्चा रंगू लागल्या आहेत. नवी मुंबई येथील ऐरोलीमध्ये शनिवारी रात्री शिवसेनेचा (शिंदे गट) मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी एकनाथ शिंदे यांनी भाषणातून विरोधकांवर टीका केली. मी कधीही स्वत:ला नेता समजलो आणि समजणारही नाही. कार्यकर्ते आपल्याला मोठे करतात. दु:ख, अडचणीमध्ये नेत्यांनी उभे राहिले पाहिजे ही कार्यकर्त्यांची अपेक्षा असते. आपण इतके केले तर हा कार्यकर्ता आपल्यासाठी अहोरात्र काम करत जीवाची बाजी लावायला तयार असतो असे शिंदे म्हणाले. संपूर्ण राज्यभरातून शिवसेनेत पक्षप्रवेश होत आहेत. शिवसेना हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. शिवसेना सर्वसामान्य नागरिकांशी बांधिल आहे. भारतात २३ राज्यांमध्ये शिवसेना आहे. मी काल ही कार्यकर्ता म्हणून काम करत होतो, आजही करत आहे आणि उद्याही कार्यकर्ता म्हणूनच काम करणार आहे. बाळासाहेब आपल्याला सवंगडी समजायचे. परंतु त्यांच्या पश्चात काही लोक आपल्याला घरगडी समजू लागले होते. खरा वाघ कोण आणि वाघाचे पांघरून घेतलेले लबाड कोल्हे कोण हे जनतेने दाखवून दिले आहे अशी टीका देखील त्यांनी केली.

मी कधीही खूर्चीसाठी कासावीस झालो नाही. कधीही तडजोड करणार नाही. कारण मी बाळासाहेबांचा शिवसैनिक आहे. माझ्या प्रत्येक रक्ताच्या थेंबावर माझ्या लाडक्या बहिणींचा, लाडक्या भावांचा, माझ्या लाडक्या शेतकऱ्यांचा अधिकार आहे. पायाला भिंगरी लावून आम्ही काम केले आहे.



## ‘२०४७ पर्यंत काँग्रेस हद्दपार झाल्याशिवाय राहणार नाही’, दिल्लीच्या निकालावरून चंद्रशेखर बावनकुळे यांचं विधान

■ मुंबई : मेहुल गायकवाड

दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल ८ फेब्रुवारी रोजी जाहीर झाला. दिल्लीत भारतीय जनता पक्षाने बहुमत मिळवलं आहे, तर दुसऱ्या क्रमांकावर आम आदमी पक्षाने जागा मिळवल्या आहेत. भाजपाला ४८ आणि आम आदमी पक्षाला २२ जागा मिळवण्यात यश आलं आहे. मात्र, या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला एकही जागा मिळालेली नाही. दिल्लीत आता लवकरच भाजपाचं सरकार स्थापन होणार आहे. खरं तर इंडिया आघाडीत एकत्र असूनही काँग्रेस आणि आम आदमी पक्ष दिल्लीची निवडणूक स्वतंत्रपणे लढले. मात्र, याचाच फटका दोन्ही पक्षाला बसल्याचा दावा आता इंडिया आघाडीतील नेत्यांकडून केला जात आहे. काँग्रेसला सलग तिसऱ्यांदा दिल्लीत मोठ्या पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. दरम्यान, दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळातून आता प्रतिक्रिया येत आहेत. तसेच दिल्लीत काँग्रेसला एकही जागा न मिळाल्यामुळे काँग्रेसवर सत्ताधारी पक्षाकडून टीका करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही काँग्रेसवर जोरदार टीका केली. ‘२०४७ पर्यंत काँग्रेस हद्दपार झाल्याशिवाय राहणार नाही’, असं म्हणत चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला आहे. ते माध्यमांशी बोलत होते. ‘काँग्रेस पक्षाकडे कोणतंही मॉडेल नाही. कोणतीही निती नाही. काँग्रेसकडे कोणतीही नितिमत्ता नाही. जनता काँग्रेसला मते का



देतील? त्यांच्याकडे कोणतीही योजना नाही. २०४७ पर्यंत काँग्रेस हद्दपार झाल्याशिवाय राहणार नाही. २०४७ पर्यंत या देशात काँग्रेस निवडणूक जिंकू शकत नाही. कारण २०४७ पर्यंत विकासाचा मार्ग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या संकल्पावर राष्ट्र पुढे चालणार आहे. जनता देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आणि भारतीय जनता पक्षाच्या संकल्पांना साथ देईल’, असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना म्हटलं आहे.

## ‘एपीएमसी’ला अतिक्रमणाचा विळखा; बाजार समितीच्या आवाराबाहेर बेकायदा पार्किंग, फेरीवाल्यांचे बस्तान

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती अतिक्रमणाच्या विळख्यात अडकली आहे. पाच ही बाजार आवाराबाहेर अनधिकृत पार्किंग, वाहतूक कोंडी, फेरीवाले यांचे बस्तान वाढत आहे.

एपीएमसी भाजीपाला बाजाराबाहेर फुटपाथवर अनधिकृत व्यावसायिकांनी पदार्थ बनविण्यासाठी ज्वलनशील साहित्य व्यवसाय पदपथावर थाटला आहे. कोणतीही अग्निशमन यंत्रणा उपलब्ध नसून रस्त्यावरच गॅस सिलेंडर सारखे ज्वलनशील साहित्य ठेवल्याने भविष्यात मोठी दुर्घटना, घातपात होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे येथील अनधिकृत व्यवसायिकांना हटविण्याचे मागणी होत आहे. मात्र याठिकाणी त्या दुकानधारकांकडून फुटपाथवरील जागेची भाडे वसुली करून जागा उपलब्ध करून दिली जाते असा आरोप बाजार घटकांमधून व्यक्त होत आहे. एपीएमसी आवारात आधीच फेरीवाले यांचे बस्तान असते त्यात आता माथाडी भवन चौकात अनधिकृत पणे गाड्या उभ्या करून शेतमालची विक्री व्यवसाय केला जात आहे. रस्त्यावरच वाहने उभी केल्याने परिसरात वाहतूक कोंडीची समस्या उद्भवत आहे. एपीएमसी



ही सर्वात मोठी बाजारपेठ आहे. परंतु शेतमालावरील नियमन मुक्ती उठवल्याने एपीएमसीतील महत्वाच्या मुख्य चौका चौकात, रस्त्यावर गाड्या उभ्या करून शेतमालाची विक्री केली जात आहे. एपीएमसी से.१९ येथील बाजार आवारात ही वाढीव जागेचा वापर सुरूच आहे. एकेकाळी वाढीव जागेच्या वापरावर कारवाईचा बडगा उगला होता, परंतु आता पालिकेचे याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. एपीएमसी माथाडी भवन येथील बाजारात आधीच पार्किंगची समस्या उद्भवत आहे. हा रस्ता पाचही बाजाराला जोडला गेला आहे. त्यामुळे याठिकाणी वाहनांची वर्दळ नेहमीच असते. त्यामध्ये रस्त्यावर अनधिकृत पार्किंगचा विळखा असतो, अशातच येथील व्यापारी दुकान धारक आपला बाजार वाढीव जागेत मांडून ठेवत असतात. याठिकाणी विद्युत रोषणाईचे सामान, किराणा बाजार, करकोळ बाजार, असे अनेक प्रकारचे साहित्य फुटपाथवर अधिक जागेत पसरवून ठेवून सामायिक जागेचा वापर करीत आहेत. रस्त्यालगत पार्किंग व फुटपाथाला लागून व्यापाऱ्यांचे बस्तान यामुळे पादचाऱ्यांना फुटपाथवरुन जाताना त्रास सहन करावा लागत आहे.

## ठाण्याला मिळणार दोन वर्षात दोनशे दशलक्षलीटर वाढीव पाणी, ठाणे महापालिका आयुक्तांची माहिती

■ ठाणे : संजय बोडके

ठाणे, घोडबंदर, कळवा, मुंब्रा आणि दिवा परिसरात गेल्या काही वर्षापासून पाणी टंचाईची सातत्याने जाणवत असतानाच, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी शुक्रवारी ठाण्याच्या मालमत्ता प्रदर्शन कार्यक्रमात बोलताना केलेल्या सुतोवाचामुळे ठाणेकरांची जलचिंता लवकरच मिटण्याची चिन्हे आहेत. ठाणे शहराला यंदाच्या वर्षात शंभर दशलक्षलीटर तर पुढील वर्षात शंभर दशलक्षलीटर असे दोनशे दशलक्षलीटर इतके वाढीव पाणी उपलब्ध होईल, अशी माहिती राव यांनी दिली आहे.

एमसीएचआय क्रेडाई या ठाण्यातील बांधकाम व्यावसायिकांच्या संघटनेने आयोजित केलेल्या मालमत्ता प्रदर्शन कार्यक्रमात बोलताना ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी उपस्थितांना शहराच्या पाणी आराखड्याबाबत माहिती दिली. ठाणे शहरात सद्यस्थिती मुबलक



प्रमाणात पाणी उपलब्ध असले तरी भविष्याचा विचार करून २०५५ पर्यंतचा पाणी आराखडा तयार करण्यात आलेला आहे. या आराखड्यानुसार यंदाच्या वर्षात शंभर दशलक्षलीटर तर पुढील वर्षात शंभर दशलक्षलीटर असे दोनशे दशलक्षलीटर इतके वाढीव पाणी उपलब्ध होईल. यामुळे २०२६ मध्येच ठाणे शहरात पुढील २०३५ पर्यंत पुरेल एवढा पाणीसाठा उपलब्ध असेल, असा दावा आयुक्त राव यांनी केला.

ठाण्याला आजच्या घडीला ५८५ दशलक्ष लीटर पाणी रोज उपलब्ध होत आहे. परंतु २०५५ पर्यंत सुर्या, काळु आणि शाई धरणातून पाणी उपलब्ध करुन घेण्यासाठीचे नियोजन आखण्यात असून त्यासाठी मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री स्तरावर बैठकाही झाल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले. याशिवाय प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर कशा पध्दतीने करावा, यासाठीचे नियोजन आखण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## वांद्रे मलजल प्रक्रिया केंद्राचे काम जुलै २०२७ पर्यंत होणार पूर्ण- आयुक्त भूषण गगराणी

■ मुंबई : गणेश बागडे

वांद्रे पश्चिम परिसरात सागरी सेतू नजीक, महानगरपालिकेच्या मुंबई मलनिस्सारण प्रकल्प विभागाच्या वतीने वांद्रे मलजल प्रक्रिया केंद्राचे बांधकाम करण्यात येत आहे. सुमारे ३६० दशलक्ष लीटर प्रतिदिन क्षमतेच्या या प्रकल्पाची प्रारंभीची संरचनाविषयक कामे होवून उभारणीने आता वेग घेतला आहे. त्यादृष्टिने प्रत्यक्ष केंद्राच्या जागी भेट देवून महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी कामांची पाहणी केली.



विशेष म्हणजे या प्रकल्पांच्या आड येणाऱ्या सुमारे २६५ झाडे ही मालाड तसेच संजय गांधी राष्ट्रीय अभयारण्य आदी परिसरांमध्ये नेवून यशस्वी पुनरीपण करण्यात आले आहे. हा प्रकल्प जुलै २०२७ पर्यंत पूर्ण होणार आहे. वांद्रे (पश्चिम) येथे सागरी सेतूनजीक महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या मलजल प्रक्रिया केंद्राच्या प्रगतीची महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी ८ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली. उपआयुक्त (अभियांत्रिकी) शशांक भोरे, प्रमुख अभियंता (मुंबई मलनिस्सारण प्रकल्प) राजेश ताम्हाणे, उप प्रमुख अभियंता (मुंबई मलनिस्सारण प्रकल्प) राजेंद्र परब, कंत्राटदार एल ॲण्ड टी यांचे वतीने प्रकल्प व्यवस्थापक विनया हेब्बार, सल्लागार कंपनी आयव्हीएल यांचे वतीने मुरली हे यावेळी उपस्थित होते. वांद्रे मलजल प्रक्रिया केंद्राचे रचना, बांधकाम आणि प्रचालन व परिरक्षण करण्याचे काम कंत्राटदार मे. लार्सेन अँड टुब्रो लि. यांना ३१ मे २०२२ रोजी प्रदान केले गेले. प्रत्यक्ष प्रकल्प स्थळी निर्मिती करण्याचे काम ०५ जुलै २०२२ पासून सुरू झाले. प्रकल्पाची रचना व बांधकाम कालावधी ५ वर्षे इतका आहे. प्रकल्पाचे सल्लागार म्हणून आयव्हीएल इंडिया एन्व्हायर्नमेंटल आर अँड डी प्रा. लि. जबाबदारी सांभाळत आहेत. प्रारंभी महानगरपालिका आयुक्त गगराणी यांनी प्रकल्पाच्या प्रतिकृती (मॉडेल) ची पाहणी केली.

## वाहन चालकांना वाहतूक नियमांचे प्रशिक्षण देणारी संस्था सुरू करणार- पोलीस आयुक्त अमितेश कुमार

■ पुणे : अकिल शेख

पुणे पोलिसांच्या वाहतूक शाखेत दाखल होणारे पोलीस अधिकारी, तसेच शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे प्रशिक्षण देणारी संस्था सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी केली. वाहतूक पोलिसांची कार्यपद्धती, वाहतूक समस्या, तसेच आव्हानांची माहिती देण्यासाठी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या संकल्पनेतून वाहतूक शाखा, पुणे पूॅटफॉर्म, फॉर कोलॅबोरिटिव्ह रीस्पॉन्स (पीपीसीआर), टॉप मॅनेजमेंट कन्सोटिय्यम फाऊंडेशन (टीएमसीएफ) आणि जहाँगीर रुग्णालयाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी ‘ पुणे ट्रॅफिक मिटिगेशन इंटर्नशिप प्रोग्राम’ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात सहभागी झालेल्या महाविद्यालयीन युवकांना पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. या वेळी ते बोलत होते. सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, पिनॅकल इंडस्ट्री अँड इकोमोबिलिटीचे संचालक सुधीर मेहता, वेकफिल्ड कंपनीचे संचालक मुकेश मल्होत्रा, माय पेज पुणेचे संचालक अजय अगरवाल, ट्रान्सपोर्टेशन सिस्टीम स्ट्रॅटेजिस्ट डिझायनरचे निशित कामत या वेळी उपस्थित होते. पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, ‘महाविद्यालयीन विद्यार्थी, तसेच वाहतूक शाखेत दाखल होणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना वाहतूक विषयक समस्या, आव्हाने, नियमांची माहिती देण्यासाठी पुणे पोलिसांकडून प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात येणार आहे. पुण्यातील वाहतूक समस्येची माहिती, नियमांचे पालन, नियमभंग केल्यास होणारी कारवाई याबाबतची माहिती देण्यात येणार आहे. अपघात घडल्यानंतर केल्या जाणाऱ्या उपायोजनांची माहिती देण्यात येणार आहे. पुण्यातील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी पुणे पोलिसांनी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी महापालिकेसह विविध यंत्रणांशी समन्वय साधून वाहतूक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. रस्त्यावरील कोंडी सोडवून वाहतूक गतिमान करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. दुतर्फा झालेल्या अतिक्रमणांवर कारवाई करण्यात येत आहे.’ वाहतूक समस्या सोडविण्यासाठी पोलिसांनी झपाटून काम करणे गरजेचे आहे. ज्या भागात कोंडी होत आहे. अशा रस्त्यांची पाहणी करुन कोंडी का होते, याची माहिती घेणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने पोलिसांकडून प्रयत्न करण्यात येत आहे, असे त्यांनी नमूद केले.




मद्यप्राशन करुन वाहने चालविणे, विरुद्ध दिशेने वाहन चालविण्यासह विविध प्रकारचे वाहतूक नियमभंग करणाऱ्यांना वाहनचालकांना वाहतूक पोलिसांकडून शिक्षा देण्यात येणार आहे. वाहतूक प्रशिक्षण संस्था सुरू झाल्यानंतर नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांना संस्थेत बोलावून त्यांना वाहतूक नियमांची माहिती देण्यात येणार आहे.

वर्दळीचे चौक, तसेच वाहतूक नियमनाच्यादृष्टीने आव्हानात्मक असलेल्या चौकात विद्यार्थ्यांना चौकात नेऊन त्यांना वाहतूक नियमनाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई कशी करण्यात येते, याचीही माहिती देण्यात येणार आहे. अपघात झाल्यानंतर अपघातग्रस्तांना त्वरित मदत कशी करायची, याबाबतची माहिती देण्यात येणार आहे. सीसीटीव्ही कारवाई, तसेच तांत्रिक बाबींची माहिती देण्यात येणार आहे. वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनील गवळी, पोलीस निरीक्षक रुणाल मुल्ला, उपनिरीक्षक रघतवान हे काम पाहत आहेत.

## निवडणूकीच्यावेळी दिलेली आश्वासन पूर्ण न केल्यामुळे डबेवाला संघटना उद्धव ठाकरेंवर नाराज

■ मुंबई : सम्यक कासारे

मुंबईच्या डबेवाल्यांना गेल्या पालिका निवडणूकीच्यावेळी दिलेली आश्वासन पूर्ण न केल्यामुळे डबेवाला संघटनेने शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याविषयी नाराजी व्यक्त केली आहे. पालिकेची निवडणूक या वर्षभरात होण्याची शक्यता असून डबेवाल्यानी त्याआधीच आपली नाराजी व्यक्त केली आहे. शिवसेनेच्या २०१७ च्या मुंबई महानगरपालिका निवडणूकीच्या वेळी वचननाम्यामध्ये मुंबईतील डबेवाल्यांनसाठी काही आश्वासने दिली होती. त्यापैकी फक्त डबेवाला भवनाव्यतिरिक्त दुसरे कोणतेच आश्वासन त्यांनी पूर्ण केले नाही. त्यामुळे डबेवाला कामगारांमध्ये शिवसेना (ठाकरे) पक्षाबद्दल मोठ्या प्रमाणावर नाराजी असल्याची प्रतिक्रिया मुंबई डबेवाला असोशिएशनचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी समाज माध्यमावर व्यक्त केली आहे. तळेकर यांनी म्हटले आहे की, मुंबई महानगर पालिकेत शिवसेनेची पाच वर्षे सत्ता होती. काही काळ उध्दव



ठाकरे हे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री होते. तरीही वचने पूर्ण झाली नाहीत. आपण अनेकदा याबाबत उध्दव ठाकरे यांना पत्र लिहले पण काहीही कार्यवाही झाली नाही. जर आश्वासन पूर्ण करायची नव्हती तर ती आश्वासने त्यांनी द्यायलाच नको होती, अशी सर्व साधारण भावना डबेवाला कामगारात असल्याचेही तळेकर यांनी म्हटले आहे.

दरम्यान, शिवसेनेची दोन शकले पडल्यानंतर डबेवाला संघटनेने उद्धव ठाकरे यांना जाहीर पाठिंबा दर्शवला होता. मात्र येत्या पालिका निवडणूकीच्या तोंडावर डबेवाला संघटनेने अशी जाहीर नाराजी व्यक्त केल्यामुळे ही नाराजी ठाकरेना भोवणार का अशी चर्चा सुरु झाली आहे.

**कोणती आश्वासने दिली होती**

१) मुंबईतील डबेवाल्यांना संघटित करून स्वतंत्र कंपनी स्थापन करणार.

२)या कंपनीला पहिल्या वर्षी किमान ५ कोटी रुपयांचे आर्थिक पाठबळ देणार.

३)सायकल खरेदी/पार्किंगसाठी सहकार्य, मुलांचे शिक्षण, कुटुंबाला आरोग्यसेवा देण्यासाठी कार्पोरेट व सामाजिक विभागां मार्फत मदत,

४) कार्यालयासाठी तसेच विश्रांतीसाठी मुंबईत डबेवाला भवन बांधणार.

## ‘मॅट’ चा निर्णय रद्द; निवडणूक काळातील ७३ पोलिसांच्या बदल्या कायम

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी ७३ पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याचा राज्य सरकारचा निर्णय उच्च न्यायालयाने नुकतेच योग्य ठरवला. तसेच, या बदल्या तात्पुरत्या स्वरुपाच्या होत्या, असा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचा (मॅट) निर्णय न्यायालयाने रद्द केला. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या (ईसीआय) आदेशानुसार करण्यात आलेल्या बदल्या कायदेशीर होत्या आणि त्या निवडणुकीच्या कालावधीपुरत्या मर्यादित नव्हत्या. त्यानंतरही, या बदल्या तात्पुरत्या स्वरुपाच्या होत्या आणि निवडणुका संपल्यानंतर बदली झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ नियुक्तीच्या ठिकाणी परत पाठवण्याचा अधिकार असल्याचा निर्णय न्यायाधिकरणाने दिला. तथापि, न्यायाधिकरणाचा निर्णय चुकीचा असून तो रद्द केला जात असल्याचे अतुल चांदुरकर आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठाने नमूद केले. काही ठिकाणच्या रिक्त जागांबाबत न्यायालयाने चिंता व्यक्त करून प्रक्रियेनुसार या जागा भरण्यास गृहविभागाला परवानगी दिली. निवडणूक आयोगाच्या २१ डिसेंबर २०२३ रोजीच्या आदेशानुसार, निवडणुकीशी संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या स्वातःच्या जिल्हयांमध्ये सेवा करण्यास किंवा त्याच जिल्ह्यात तीन वर्षांपेक्षा जास्त काळ कर्तव्य बजावण्यास मनाई करण्यात आली आहे.




त्यानुसार, निवडणूक काळात राज्यातील सहाय्यक निरीक्षक आणि उपनिरीक्षकांसह ७३ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. या बदल्यांच्या निर्णयाला काही अधिकाऱ्यांनी न्यायाधिकरणासमोर आव्हान दिले होते. न्यायाधिकरणाने या अधिकाऱ्यांच्या बदल्या निवडणूक काळापुरत्या मर्यादित असल्याचा निर्णय दिला होता. तसेच, या बदल्या तात्पुरत्या असून निवडणुकीनंतर त्याबाबतचा निर्णय रद्द करावा, असेही न्यायाधिकरणाने १९ जुलै २०२४ रोजीच्या निर्णयात स्पष्ट केले होते. या निर्णयाविरोधात सरकारने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. दरम्यान, निवडणूक आयोगाचे आदेश केवळ निवडणुकीत थेट सहभाग अथवा कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांना लागू होतात. बदली झालेल्या सर्व अधिकाऱ्यांसाठी लागू होत नाहीत, त्यामुळे, निवडणुकीनंतर बदल्या रद्द करायला हव्या होत्या. असा दावा अधिकाऱ्याच्या वतीने सुनावणीच्या वेळी करण्यात आला. तथापि, या केवळ निवडणुकीशी संबंधित बदल्या नाहीत, तर पोलीस कायद्याअंतर्गत घेण्यात आलेला हा प्रशासकीय निर्णय असल्याचा युक्तिवाद सरकारच्या वतीने करण्यात आला. आपल्या भूमिकेचे समर्थन करताना सरकारने २०१८ सालच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला दिला. त्यानुसार, निवडणुकीदरम्यान करण्यात येणाऱ्या बदल्यांना तात्पुरत्या बदल्या मानण्याचा कोणताही कायदेशीर आधार नाही, असे म्हटले होते.